रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २२७
www.ramprahar.com
मंगळवार, ४ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## भारतात पहिली हायड्रोजन ट्रेन २०३१मध्ये धावणार



**नवी दिल्ली** : सध्या डिझेल वापरानंतर इलेक्ट्रिककडे वळलेली भारतीय रेल्वे आता पुन्हा एकदा नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी सज्ज झाली आहे. रेल्वे मंत्रालय लवकरच भारतात हायड्रोजनवर चालणारी रेल्वे सुरू करण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे ही हायड्रोजन ट्रेन मार्च २०३१मध्ये भारतामध्ये धावण्याची शक्यता आहे. भारतातील पहिली हायड्रोजन ट्रेन चेन्नई येथील इंटिग्रल कोच फॅक्टरी येथे तयार केली जात आहे. हायड्रोजन इंधन ट्रेनचे अनेक फायदे मिळणार आहेत. याचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे यामुळे ग्रीन ट्रान्सपोर्टेशन टेक्नॉलॉजी वापरून शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे एक मोठे पाऊल असणार आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये रेल्वे मंत्रालयाने ३५ हायड्रोजन फ्युअल सेल आधारित रेल्वे विकसित करण्यासाठी २८०० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे.

### अंतरंग

पंढरीच्या विठूरायाचेही आता टोकन दर्शन/२
मूर्ती विसर्जित करताना गाडी समुद्रात बुडाली/५
कर्जतमध्ये कन्याथॉनला स्पर्धकांचा प्रतिसाद/८

# महाराष्ट्राची प्रगतिशील वाटचाल

## राज्यपालांच्या अभिभाषणाने अर्थसंकल्पीय अधिवेशनास सुरुवात

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकरी, महिला, समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी; त्याचसोबत आरोग्य, रोजगार, उद्योग, पायाभूत सोयी सुविधांच्या बळकटीकरणास शासनाचे प्राधान्य आहे. राज्य शासन सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतिशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करीत आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी सोमवारी (दि. ३) राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणात केले.



राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, राज्य शासन कृषी क्षेत्रातील संधीचा विस्तार करून शेतकरी हितास प्राधान्य देणारे निर्णय घेत आहे. राज्यामध्ये सौरऊर्जा पंपांद्वारे शेतीकरिता पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता मागेल त्याला सौर पंप योजनेंतर्गत तीन लाख १२ हजार सौर पंप बसविले आहेत. या योजनेंतर्गत पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना १० लाख सौर पंप पुरविण्यात येतील. प्रधानमंत्री-कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करणारे देशातील पहिले राज्य बनण्याचे लक्ष्य महाराष्ट्राने ठेवले आहे. राज्याने केवळ नऊ महिन्यांच्या विक्रमी वेळेत १४७ मेगावॅट एकत्रित सौरऊर्जा क्षमतेच्या एकूण ११९ वाहिन्या कार्यान्वित केल्या आहेत.

नमो ड्रोन दिदी या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये राज्यातील ३२५ महिला बचत गटांना कृषी प्रयोजनांसाठी ड्रोन वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. महिला कामगारांच्या सहभागाचा दर वाढविण्यासाठी आणि शहरांमध्ये महिलांना परवडणारी व सुरक्षित निवासव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ या अंतर्गत काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे बांधण्याची बाब प्रस्तावित केली आहे. महिलांकरिता रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी अंगणवाडी सेविकांची सुमारे १८ हजार रिक्त पदे भरण्याची भरती प्रक्रिया सुरू केली आहे.

राज्यातील विविध समाजाच्या उन्नतीसाठी १८ महामंडळे स्थापन केली आहेत. त्यासाठी प्रत्येक महामंडळाला ५० कोटी रुपये इतके भाग भांडवल मंजूर करण्यात आले आहे.

महाराष्ट्राने संपूर्ण देशात राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषदेने (नॅकने) मान्यता दिलेल्या महाविद्यालये व विद्यापीठे यांची सर्वाधिक संख्या असलेले सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. ही बाब शिक्षणाचा दर्जा सुधारणेतील राज्याची असलेली बांधिलकी अधोरेखित करते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी करत आहे आणि या प्रयोजनासाठी आवश्यक आर्थिक तरतुदी करण्यात येत आहेत. **(पान २ वर..)**

## 'लाडक्या बहिणीं'ना महिला दिनाची भेट!

### फेब्रुवारी महिन्याचा हप्ता ८ मार्चला मिळणार



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत राज्यभरातील लाभार्थी महिलांना राज्य सरकारकडून दर महिन्याला १,५०० रुपये दिले जातात. या महिलांना फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार असा प्रश्न पडला होता. त्याचे उत्तर मिळाले आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता येत्या ८ मार्च रोजी वितरीत केला जाणार आहे, अशी माहिती राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानिमित्त मंत्री तटकरे सोमवारी (दि. ३) विधीमंडळात दाखल झाल्या. या वेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. त्यांनी सांगितले की, ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विधीमंडळाचे विशेष सत्र होणार आयोजित करण्यात आले आहे. खास महिला लोकप्रतिनिधिंसाठी व राज्यातील महिलांसाठी हे सत्र असेल. याशिवाय लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता याच दिवशी वितरीत केला जाणार आहे.

येत्या ५ ते ६ मार्चपर्यंत लाडकी बहीण योजनेचा योजनेचा लाभ वितरित करण्याची प्रक्रिया सुरू होईल आणि ८ मार्चअखेर योजनेचे पैसे थेट महिलांच्या खात्यात उपलब्ध करून देणार आहोत, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले.



**मुंबई** : विधान भवनात नूतनीकरण करण्यात आलेल्या विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या दालनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी उद्घाटन करण्यात आले. या वेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह इतर मंत्री व विधीमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## अबू आझमींच्या विधानाने नवा वाद

### म्हणे, औरंगजेब उत्तम प्रशासक होता; सर्वत्र संताप!

**मुंबई** : छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित छावा चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. तरुण पिढीला प्रेरणादायी असलेल्या या चित्रपटाचे कौतुक होत असताना समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी मात्र क्रूरकर्मा औरंगजेबची तळी उचलत वादग्रस्त विधान केले आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी सपा नेते अबू आझमी हेदेखील विधानभवनात दाखल झाले. त्या वेळी माध्यमांशी बोलताना, औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील लढाई सत्तेसाठी होती. ही लढाई धर्मासाठी होती हे जर कोण बोलत असेल, तर ते मी मानत नाही, असे म्हटले. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, तर भाजप आमदार राम कदम यांनी आझमी यांचे वक्तव्य चुकीचे असून त्यांना इतिहास माहिती नाही, असे म्हटलेय.

## दुचाकीस्वाराला वाचवताना बस उलटून प्रवासी जखमी


**लातूर : प्रतिनिधी**

लातूर ते चाकूर महामार्गावर नांदगाव पाटीजवळ दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात एसटी बस उलटल्याची घटना सोमवारी (दि. ३) दुपारी पावणेदोनच्या सुमारास घडली. या अपघातात ३६ प्रवासी जखमी झाले आहेत. यातील पाच जण गंभीर आहेत.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली, तर स्थानिकही मदतीसाठी धावले व जखमींना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. अपघातामधील जखमींना लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## विधान परिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर

### २७ मार्चला मतदान



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेतील रिक्त झालेल्या पाच जागांसाठी निवडणूक आयोगाकडून निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. विधानसभा सदस्यांकडून निवडण्यात येणाऱ्या या पाच जागांसाठी २७ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी निकाल जाहीर होणार आहे.

नोव्हेंबर २०२४मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमश्या पडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधान परिषदेतील आमदार विधानसभेवर निवडून गेले होते. विधानसभेवर निवड झाल्यानंतर या पाचही जणांनी आपल्या विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे या पाच जागा रिक्त झाल्या आहेत.

या निवडणुकीसाठी १० मार्च रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १७ मार्च असेल. १८ मार्च रोजी अर्जांची छाननी होणार असून अर्ज मागे घेण्यासाठीची शेवटची तारीख २० मार्च असेल. २७ मार्च रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळेत मतदान होईल, तर संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल.

### निवडक

#### काँग्रेस प्रवक्त्यांची रोहित शर्मावर टीका; चाहते संतापले

**नवी दिल्ली** : काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. शमा मोहम्मद यांनी भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा हा जाडा व अनफिट खेळाडू तसेच वाईट कप्तान असल्याची टीका एक्स अकाउंटवरील एका पोस्टच्या माध्यमातून केली. यानंतर चाहते तसेच राजकीय नेत्यांनी शमा यांचा समाचार घेतला आहे. दरम्यान, काँग्रेसचे मीडिया प्रभारी आणि प्रवक्ते पवन खेरा यांनीही शमा यांची विधाने पक्षाच्या भूमिकेशी जुळत नाहीत, असे सांगून त्यांना समज दिली आहे. **(संबंधित वृत्त पान ८ वर..)**

#### आयआयटी बाबाविरोधात गांजा बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**जयपूर** : उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात चर्चेत आलेले अभय सिंह म्हणजेच आयआयटी बाबा यांना जयपूर पोलिसांनी गांजा बाळगल्याच्या आरोपाखाली ताब्यात घेतले होते. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आढळलेल्या गांजाचे प्रमाण परवानगीच्या मर्यादेत असल्याने पोलिसांनी त्यांना काही वेळासाठी ताब्यात घेतल्यानंतर सोडून दिले.



**पनवेल** : आई गावदेवी युवा मित्र मंडळाच्या वतीने पापडीचा पाडा ते कार्लादरम्यान एकवीरा पालखी पदयात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सोमवारी भेट देत दर्शन घेतले व भाविकांना शुभेच्छा दिल्या.

## संशोधन, तंत्रज्ञानावर भर द्या -डॉ. देवानंद शिंदे

### सीकेटी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यश मिळवायचे असेल तर प्रामाणिक राहून सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. त्याचबरोबर भविष्यात संशोधन, तंत्रज्ञानावर भर द्यावा, असे आवाहन कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू व मुंबई विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे पदवी आणि पदव्युत्तर वर्षाच्या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन सोमवारी (दि. ३) करण्यात आले होते. संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.



समारंभास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्यासह सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील आणि तिन्ही विद्याशाखांचे आणि विविध विभागांचे प्रमुख मंचावर उपस्थित होते.

डॉ. शिंदे यांनी आपल्या भाषणात सीकेटी महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन मिळाल्याबद्दल कौतुक केले. **(पान २ वर..)**

## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आज भारत-ऑस्ट्रेलिया सेमी फायनल

**दुबई : वृत्तसंस्था**



चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांमध्ये मंगळवारी (दि. ४) दुबईत पहिला उपांत्य सामना रंगणार आहे. दोन्ही संघांनी नेहमी एकमेकांना तगडी फाईट दिलेली असून यंदाही उभय संघ तुल्यबळ असल्याने रंगतदार लढतीची क्रिकेटप्रेमींना अपेक्षा आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये चांगली कामगिरी केली आहे. आतापर्यंत टीम इंडिया अपराजित असून गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकले आहेत. भारताने अ गटामध्ये पहिल्या सामन्यात बांगलादेशचा सहा गडी राखून पराभव केला होता. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानला सहा विकेट्सने मात दिली, तर शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडला रोखत विजयाची हॅट्‌ट्रिक नोंदवली.

दुसरीकडे ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना इंग्लंडशी झाला, ज्यात 'कांगारूं'नी विजय मिळवला. ऑसी संघाचा दुसरा सामना दक्षिण आफ्रिकेशी होता, मात्र हा सामना पावसामुळे रद्द होऊन दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला, तर अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या सामन्यातही पावसामुळे व्यत्यय आल्याने सामना रद्द होऊन दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला. अशा प्रकारे ब गटात सर्वाधिक चार गुण मिळवून ऑस्ट्रेलिया संघ उपांत्य फेरीत दाखल झाला आहे.


भारत आणि ऑस्ट्रेलिया १५१ एकदिवसीय सामन्यांमध्ये आमनेसामने आले आहेत. यापैकी ऑस्ट्रेलियाने ८४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. भारताने ५७ सामने जिंकले आहेत, तर १० सामने अनिर्णित संपले आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीबद्दल बोलायचे झाले तर दोन्ही संघ चार वेळा समोरासमोर आले आहेत. यापैकी दोन सामने भारताने जिंकले आहेत. एक सामना ऑस्ट्रेलियाने जिंकला आहे, तर एक सामना अनिर्णित राहिला आहे.

## कोर्लई किनारी प्रेत आले वाहून

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई समुद्र किनारी एका पुरुषाचे प्रेत वाहून आले आहे. खूप दिवस पाण्यात राहिल्याने या अनोळखी व्यक्तीच्या शरीराचा काही भाग समुद्री जीवांनी खाल्लेला तसेच त्याच्या अंगावर कपडे नसल्याचे आढळून आले आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून शवविच्छेदन करण्यासाठी प्रेत अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. पोलीस हे मयताच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. जर कुणाला या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास रेवदंडा पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




# पंढरीच्या विठूरायाचेही आता टोकन दर्शन

## आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांचे हस्ते पहिले पूजन

**सोलापूर : प्रतिनिधी**

पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक येत असतात. आषाढी एकादशीला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी, पायी वारी करतात. आता विठुरायाच्या दर्शनाला येणाऱ्या सर्वच भाविकांना झटपट दर्शन मिळणार आहे. त्यासाठी तिरुपतीच्या धरतीवर केलेली टोकन दर्शन व्यवस्थेची सुरुवात आषाढी एकादशीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केली जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

मंदिर समितीची यासंदर्भातली बैठक झाल्यानंतर औसेकर यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानुसार टीसीएस कंपनीकडून या व्यवस्थेचे सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे. आज या सॉफ्टवेअरबाबत मंदिर समिती सदस्य अधिकारी आणि टीसीएसच्या अधिकाऱ्यांमध्ये महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत आषाढी एकादशी पूर्वी संपूर्ण टोकन दर्शन व्यवस्था पूर्ण होणार असून आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्याच्या हस्ते याचा शुभारंभ केला जाईल, असे ठरले.



देशातील जवळपास नऊ मोठ्या देवस्थानात टीसीएस कंपनीकडून या दर्शन व्यवस्थेचे सॉफ्टवेअर देण्यात आले असून या ठिकाणी गेल्या काही वर्षापासून अतिशय सुरळीतपणे टोकन दर्शन व्यवस्था राबविण्यात येत आहे. हे टोकन दर्शन व्यवस्था सॉफ्टवेअर बनविताना पंढरपुरातील मोठ्या यात्रा सणांचे दिवस आणि इतर महत्त्वाच्या गर्दीच्या दिवसांचा विचार या सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठीचे टोकन घ्यावे लागणार असून यावेळेस त्यांना दर्शनाची तारीख आणि वेळ हे टोकन वरुन दिले जाणार आहे. याचवेळेत येऊन या भाविकांना देवाचे दर्शन केवळ दीड ते दोन तासात घेता येणार आहे.

### १५ दिवसांत जिल्हा प्रशासनाची बैठक

टोकन दर्शन व्यवस्था सुरू केली तरी काही दिवस भाविकांना माहिती होण्यासाठी मुख्य दर्शन रांग देखील सुरू ठेवली जाणार आहे. याशिवाय देशभरातील भाविकांना ऑनलाइन बुकिंग करूनही देण्यात येणाऱ्या दर्शनाची रांग सुरूच राहणार आहे. आता टोकन दर्शन रांग ,ऑनलाईन दर्शन रांग आणि मुख्य दर्शन रांग या तिन्हीचे एकत्रीकरण कशा रीतीने करायचे याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि पोलिस अधीक्षक यांच्यासोबत एक बैठक होऊन त्यानुसार अंतिम आराखडा तयार होईल,



खोपोली : भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत पाली फाटा येथील खालापूर तालुका प्रभारी तालुका अध्यक्ष सनी यादव यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी रवींद्र चव्हाण यांनी खालापूरचा आढावा घेत पुढील काळात पक्ष संघटनावाढीसाठी बळ देण्यात येईल असे तालुकाध्यक्ष यादव यांना आश्वस्त केले.

# कर्जत येथील प्रशासकीय भवनासमोर पार्किंग करताना गाड्या पडतात गटारात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात प्रशासकीय भुवन उभे राहिले असून तेथे प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांची कार्यलये आहेत. मात्र त्या ठिकाणी सरकारी कामासाठी येणाऱ्या लोकांना आपली वाहने उभी करण्यासाठी असलेली जागा वाहनांसाठी असुरक्षित आहे. वाहनांच्या पार्किंगसाठी असलेल्या ठिकाणी गटारांभोवती संरक्षण भिंती नसल्याने वाहने गटारात पडण्याच्या असंख्य घटना घडल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग त्या ठिकाणी वाहनाच्या पार्किंगची व्यवस्था करण्यासाठी पार्किंग क्षेत्र सुस्थितीत आहे काय? असा प्रश्न वाहने चालक उपस्थित करीत आहेत.

कचेरी टेकडी येथे असलेले तहसील कार्यालय शहरात मध्यवर्ती ठिकाणी बांधलेल्या प्रशासकीय भवन येथे आले आहे. मागील वर्षभर याच प्रशासकीय भवन मधून कारभार सुरु असून अनेक असुविधा त्या ठिकाणी आहेत. या ठिकाणी सरकारी



कामासाठी येणारे वाहनचालक यांच्या गाड्या उभ्या करण्यासाठी कायमस्वरूपी अशी कोणतीही जागा उपलब्ध नाही. प्रशासकीय भवनाच्या बाजूला पोलीस मैदान असून तेथे मोठ्या प्रमाणात वहाने पार्क केली जात असून ती जागा सुरक्षित समजली जाते.

मात्र प्रामुख्याने प्रशासकीय भवन येथे सरकारी कामासाठी आलेल्या लोकांच्या वाहने पार्किंग करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आलेली नाही. भवनाच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाचा जुना बंगला होता,तो । तोडण्यात आल्याने तेथे असलेल्या जागेवर वाहने उभी करून लोक आपल्या सरकारी कामासाठी प्रशासकीय भवन मध्ये जातात.

त्या ठिकाणी असलेल्या जागेमध्ये कुठेही सपाटीकरण करण्यात आलेले नाही. संरक्षण भिंती नाही आणि असलेली गटारे हि अर्धवट अवस्थेत आहेत. त्यामुळे घाई असलेले लोक आपली वाहने त्या ठिकाणी घाईगडबडीत लावण्यास जातात आणि तेथे लहान अपघात होतात. गटारात पडलेली वाहने काढताना वाहनचालक आणि त्या गाडी मधील प्रवासी यांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तेथील जागेचे सपाटीकरण करून अभ्यांगतांसाठी पार्किंग असे नमूद करणारे फलक सार्वजनिक बांधकाम खात्याने लावण्याची गरज आहे. अनेक वाहनचालक हे वाहने गटारात गेल्यावर ती वाहने बाहेर काढली असताना होणारे नुकसान यांची भरपाई कोण देणार असा प्रश्न उपस्थित होते आहे.

# महात्मा बसवेश्वर पुस्तकाचे प्रकाशन

**खोपोली : प्रतिनिधी**

जेष्ठ कवयित्री व लेखिका रेखा कोरे लिखित 'महात्मा बसवेश्वर' – कृतितून प्रगतीकडे या पुस्तकाचे शानदार प्रकाशन रविवारी खोपोलीतील ऋषींवन रिसॉर्टच्या सभागृहात दिमाखात संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नवी मुंबई महानगर पालिका माजी उपमहापौर शशिकांत बिराजदार हे उपस्थित होते.त्यांच्या सह विशेष अतिथी म्हणून निवृत्त जिल्हाधिकारी व जेष्ठ सनदी अधिकारी सुभाष सोनवणे , कोकण विभागाचे उपायुक्त गणेश शेटे , अतिरिक्त जिल्हाधिकारी जगन्नाथ विटकर, निवृत्त जीएसटी उपायुक्त अविनाश पाटणे, उद्योजक सुहास कोरे , अनघा प्रकाशनचे अमोल नाले, लेखिका रेखा कोरे , निवृत्त उपप्राचार्य अण्णासाहेब कोरे ,माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर , जेष्ठ नेते उल्हासराव देशमुख, जेष्ठ लेखिका व कोमसाप च्या खोपोली शाखा अध्यक्ष उज्वला दिघे , माजी नगरसेवक मोहन औसरमल, राजू गायकवाड, किशोर पानसरे, कोकण मराठी साहित्य परिषद खोपोली शाखाचे सर्व पदाधिकारी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व कोरे परिवाराचे सर्व सदस्य सह मोठ्या प्रमाणावर साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये साकारली दुबई! कर्जत महोत्सव २०२५चा शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

संकल्प सामाजिक संस्था आणि भारतीय जनता पार्टी कर्जत यांचेवतीने आयोजित करण्यात आलेल्या कर्जत महोत्सव २०२५ चा शुभारंभ सोमवारी झाला . या निमित्ताने कर्जत मधील एका मैदानावर प्रति दुबई उभारण्यात आली आहे. हा महोत्सव २५ मार्च पर्यंत सुरु राहणार आहे.

रॉयल गार्डनच्या शेजारील मैदानावर कर्जत महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष वसंतराव भोईर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आयोजक सुनिल गोगटे भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष किसान मोर्चा, कर्जत शहराध्यक्ष विजय जिंनगरे, माजी महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष कल्पनाताई दास्ताने, भाजप महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष स्नेहा गोगटे, युवा मोर्चाचे जिल्ह्याचे खजिनदार मिनेश मसणे, युवा मोर्चा शहराध्यक्ष सर्वेश गोगटे, संकल्प सामाजिक संस्थेचे सचिव समीर सोहोनी, सदस्य किशोर वैद्य, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस राधा बहुतुले, कर्जत तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष वर्षाताई सुर्वे , महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष प्रीती तिवारी, अंकिता तिवारी, योगेश पोथरकर, रमाकांत जाधव साईश्रुत सोनवणे, विलासजी श्रीखंडे, प्रशांत उगले, पत्रकार अशोक गायकवाड, जयेश गायकवाड, प्रथमेश कुडेकर, धरम इजारे, महेंद्र कांबळे, चेतन सुर्वे आदी उपस्थित होते

या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेला थीम पार्क यामध्ये दुबई येथील बुर्ज खलिफा दुहेरी या टॉवर रशियन चार्ज मलेशियन टॉवर लंडन ब्रिज असे विविध सेल्फी पॉईंट्स उभारण्यात आलेले आहेत. पुढील कालावधीत विविध स्पर्धांचे आणि इव्हेंटचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती सुनील गोगटे यांनी दिली.

# पनवेल महापालिकेत लोकशाही दिनी सात अर्ज दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात सोमवार ( दि. ३) रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवाद वाढीसाठी महापालिकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. या वेळी एकूण सात अर्ज प्राप्त झाले. त्यावर कार्यवाही करण्याचे संबंधित विभागांना आदेश देण्यात आले.



या सर्व कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे ,लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे,सहाय्यक आयुक्त सर्वश्री स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मोर्बा येथे रमजाननिमित्त खाद्यपदार्थांची रेलचेल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील हॉटेल रुहीचे नाव सर्वदूर परिचित आहे.या हॉटेलची गेल्या अनेक वर्षाची परंपरा असून या हॉटेलमध्ये दरवर्षी मुस्लिम धर्मियांच्या खास पवित्र रमजान महिन्यानिमित्त रोजा(उपवास) सोडण्यासाठी चमचमीत विविध खाद्यपदार्थ बनविले जातात.हे चमचमीत खाद्यपदार्थ खवय्यांसाठी खास पर्वणी ठरत आहे. या हॉटेलचे मालक इम्तियाज धनसे हे गेली अनेकवर्ष हे हॉटेल चालवीत असून हॉटेलमधील रुचकर व



चवदार पदार्थांमुळे या हॉटेलचे नाव रायगड जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यात सर्वदूर पोहचले आहे.

इस्लाम धर्मात रमजान महिन्यात दिवसभर अन्न पाणीविना रोजा धरला जातो. रोजा सायंकाळी मगरीबच्या बांगीनंतर सोडला जातो. त्याला इफ्तारी असे म्हणतात. या इफ्तारीसाठी मुस्लिम बांधवांच्या घरांतून विविध खाद्यपदार्थ दररोज बनविले जातात.

मोर्बा येथील हॉटेल रुही मधील खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यायला खवय्ये विसरत नाहीत. रायगड,रत्नागिरी जिल्ह्यातून खवय्ये हे पदार्थ खरेदी करण्यासाठी मोर्बा येथे येत असतात.या रुही हॉटेलमध्ये खास रमजान निमित्त मावा जिलेबी,हलवा पराठा, रबरी, मालपवा, मँगो मालपवा, ड्रायफ्रूट मालपवा, व्हॅनिला फेरणी, मँगो फेरणी, जिलेबी रबरी,शाही तुकडा,मावा खाजा,ड्रायफ्रूट बर्फी, गुलाबजाम, चिकन तंदुरी,रगडा,भजी,वडा,चिकन समोसा, पंजाबी समोसा, चिकन रोल असे` विविध खाद्यपदार्थ बनविले जात आहेत.तत्पर सेवा देण्यासाठी हॉटेल मालक इम्तियाज धनसे हे जातीने लक्ष देऊन असतात.

पान १ वरुन

## महाराष्ट्राची प्रगतिशील वाटचाल

महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीसाठी पसंतीचे राज्य असून देशातील अग्रेसर औद्योगिक राज्य असलेल्या महाराष्ट्राचे देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान आहे. जानेवारी २०२५मध्ये स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत. त्यामुळे राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे पाच हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्याची योजना आखली आहे.

राज्यातील युवकांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत एक लाख ३२ हजारांपेक्षा अधिक युवकांनी प्रशिक्षण घेतले आहे. शासनाने २०२४–२५ या वर्षासाठी १० लाख युवकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे आणि या प्रयोजनासाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नागपूर–गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा द्रुतगती मार्ग सर्वांना विश्वासात घेऊन पूर्ण करण्यात येईल. या द्रुतगती मार्गामुळे त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक व तीर्थस्थळे जोडण्यात येतील. हा द्रुतगती मार्ग, केवळ प्रवासाचा वेळच कमी करणार नाही तर या प्रदेशातील आर्थिक विकासालादेखील चालना देईल. पथकर नाक्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, पथकर नाक्यांवरील गर्दी कमी करण्यासाठी व डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ एप्रिलपासून राज्यभरातील सर्व पथकर नाक्यांवर केवळ फास्टॅगद्वारे पथकर भरण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र–कर्नाटक सीमा विवाद सोडविण्यासाठी वचनबद्ध आहे. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती केली आहे. शासन सीमावर्ती भागामध्ये राहणाऱ्या मराठी भाषिक जनतेसाठी शैक्षणिक, वैद्यकीय व इतर विविध कल्याणकारी योजना राबवित असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

या अधिवेशनामध्ये नवीन वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय प्रस्ताव, विनियोजन विधेयके व इतर विधिविधाने आपल्या विचारार्थ मांडण्यात येतील. महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी, सन्माननीय सदस्य, कामकाजात सहभाग घेतील व या प्रस्तावांवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडतील, असा विश्वास राज्यपालांनी शेवटी व्यक्त केला.

## संशोधन, तंत्रज्ञानावर भर द्या –डॉ. देवानंद शिंदे

विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी, कारणे सांगणारी माणसे मोठी होत नाहीत आणि मोठी माणसे कारणे देत नाहीत, असे सांगून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही प्रत्येकाला संधी मिळण्याचे ठिकाण असल्याचे नमूद केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात, प्रत्येक विद्यार्थ्याने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे व संघर्ष हाच यशाचा मार्ग आहे, असे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थांना ही पदवी घेऊन शांत राहू नका, तर पुढच्या पदव्यादेखील प्राप्त करा, असे सांगून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. या वेळी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र तसेच विद्यावाचस्पतीप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांची ओळख इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर.व्ही. येवले यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. येवले, प्रा. ए.व्ही. पाटील व डॉ. गीतिका तंवर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार परीक्षा नियंत्रक डॉ. एस.आय. उन्हाळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. उन्हाळे, विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्ष डॉ. एम.ए. म्हात्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.डी. आघाव यांनी परिश्रम घेतले.

# लाईनमन दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कल्याण : प्रतिनिधी**

अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारखीच वीज ही आपल्या आयुष्यातील मूलभूत गरज बनली आहे. विजेशिवाय जगण्याची कल्पनाच करता येणार नाही, इतके अनन्यसाधारण महत्त्व विजेला आहे. वीज वितरण यंत्रणेचा कणा असलेल्या जनमित्रांच्या अर्थात लाईनमनच्या कार्याचा उचित गौरव करण्यासाठी ४ मार्च हा दिवस देशभर 'लाईनमन दिवस' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने जनमित्रांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी कल्याण आणि भांडुप परिमंडळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



मिनिटभरही वीजपुरवठा खंडित झाला की ग्राहक तो कधी सुरू होईल याची वाट पाहत असतात. यादरम्यान महावितरणचे अभियंते आणि जनमित्र यांना कोणत्या परिस्थितीत व विविध अडथळ्यांना तोंड देत रात्री–अपरात्री कोणती व कशी कामे करावी लागतात याची माहिती फारशी कोणाला नसते.

महानगरापासून ते खेड्यापाड्यापर्यंत सर्व प्रकारच्या ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणचे अभियंते व जनमित्रांना दक्ष राहावे लागते. वीज दिसत नाही. वीजयंत्रणेत काम करण्याचा कितीही वर्षांचा अनुभव असला तरी विजेशी मैत्री होऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या क्षणी अनावधानाने झालेली चूकही जीवावर बेतू शकते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर रात्री–अपरात्री अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व धोकादायक आव्हाने पेलून अभियंता व जनमित्रांना वीजपुरवठा सुरळीत करण्याचे कर्तव्य बजवावे लागते.

उन्हाचा तडाखा, तापलेली वीजयंत्रणा, वाढलेली विजेची मागणी त्यानंतर वादळे, अवकाळी पाऊस व त्यानंतरचा मान्सूनचा संततधार पाऊस, पूर अशा प्रतिकूल परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे जनमित्र सज्ज असतात. महावितरणच्या पुरुष व महिला तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांवर २४ तास वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासह इतर विविध ग्राहकसेवा देण्याची जबाबदारी आहे. यासोबतच थकीत वीजबिलांची वसुली करणे, थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे, वीजचोरीविरोधात कारवाई करणे आदी महत्त्वाची कामे त्यांना करावी लागतात.

## संपादकीय

# निष्पक्ष चौकशी आवश्यक

कथित फसवणूक प्रकरणी 'भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ' अर्थात 'सेबी'च्या माजी अध्यक्ष माधबी पुरी बुच व अन्य पाच जणांविरोधात गुन्हा नोंदवण्याचे आदेश मुंबईतील विशेष न्यायालयाने एसीबीला म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाला दिले आहेत. सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे हित जपण्याबाबत या अधिकाऱ्यांनी खरोखरीच उदासीनता दाखवली आहे का हे या प्रकरणीच्या चौकशीतूनच समोर येऊ शकेल.

**शेअर बाजारातील नियामकविषयक नियमांची अंमलबजावणी करण्यात संगनमत करून कसूर केली असल्याचे प्रथमदर्शनी पुरावे आहेत. आरोपांविषयी निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने तपास होणे आवश्यक असल्याने वरळीमधील एसीबीने एफआयआर नोंदवून तपास करावा असे मुंबईतील विशेष एसीबी न्यायालयाने एका प्रकरणी शनिवारी दिलेल्या आदेशात नमूद केले. ठाण्यातील पत्रकार सपन श्रीवास्तव यांनी दाखल केलेल्या अर्जावर न्यायालयाने हा आदेश दिला. या प्रकरणातील संबंधित कंपनीकडून सेबीच्या निकषांचे व मानकांचे पालन होत नसतानाही ती सूचिबद्ध करण्यास सेबीच्या काही अधिकाऱ्यांनी परवानगी दिली. संबंधित कंपनी ही आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे भासवून गुंतवणूकदारांची दिशाभूल केली गेली आणि आरोपींनी त्यासाठी नोंदींमध्ये फेरफार केला. कंपनी सूचिबद्ध झाल्यानंतर कंपनीच्या प्रवर्तकांनी सार्वजनिक पैशाचा अपहार केला आणि तक्रारदारांनी लक्ष वेधूनही सेबीने प्रतिबंधात्मक उपाय केले नाहीत, यामुळे गुंतवणूकदारांचे नुकसान झाले असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. कंपन्यांचे प्रवर्तक स्वार्थी हेतूंनी वागू शकतात. परंतु सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या हितांचे रक्षण करणे ही 'सेबी'ची जबाबदारी आहे. सेबीकडून या कर्तव्याचे पालन होते आहे का असा प्रश्न या प्रकरणामुळे उपस्थित झाला आहे. कंपनी प्रवर्तकांच्या अप्रमाणिकपणाची झळ सर्वसामान्य गुंतवणूकदारांना बसण्याची भारतीय शेअर बाजारातील ही काही पहिली वेळ नव्हे. पण अशा प्रवृत्तींना अटकाव हा व्हायलाच हवा. अलीकडच्या काळात मध्यमवर्गीय गुंतवणूकदार गुंतवणुकीच्या पारंपरिक पर्यायांऐवजी जोखीम पत्करून मोठ्या उमेदीने शेअरबाजाराकडे वळतो आहे. अशावेळी तेथील कार्यपद्धती व संबंधित संस्थांविषयीचा विश्वास जपला जाणे निश्चितच महत्त्वाचे आहे. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक तसेच राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक हे दोन्ही गेल्या काही दिवसांपासून कोसळत आहेत. गेल्या पाच महिन्यांत सेन्सेक्स सुमारे दहा हजार अंकांनी कोसळला आहे. अमेरिका व चीन या देशांचा भारतीय शेअरबाजारावर नेहमीच मोठा प्रभाव दिसून येतो हेही सर्वज्ञात आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट'ची घोषणा केल्यापासून परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअरबाजारातून पैसा काढून घेत आहेत. अशावेळी देशातील संस्थात्मक गुंतवणूकदार व सर्वसामान्य किरकोळ गुंतवणूकदारच सध्याचा बाजाराचा डोलारा सावरून धरत आहेत. अशा वातावरणात देशातील नवख्या मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांचा आपल्याकडील यंत्रणांवरील विश्वास जपणे आणखीनच आवश्यक झाले आहे. एकीकडे आपल्या विकासदराला गती देण्याचे प्रामाणिक प्रयत्न केंद्रातील मोदी सरकारकडून सुरू आहेत. आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरची करण्याच्या स्वप्नाच्या पूर्ततेस सरकार कटिबद्ध आहे. जनतेचाही मोदी सरकारच्या कामगिरीवर अढळ विश्वास आहे. अशावेळी अधिकारपदावरील कुणी यंत्रणेतील त्रुटींचा लाभ घेऊन गुंतवणूकदारांचे नुकसान केल्यास अंतिमत: त्याचा परिणाम देशाच्या प्रगतीवर होणार आहे हे ध्यानात घ्यायला हवे. माधबी बुच व अन्य अधिकाऱ्यांच्या विरोधातील तक्रारींची चौकशी पूर्ण होऊन सत्य परिस्थिती उजेडात येईलच. देशाची प्रगतीपथावरील वाटचाल अशीच वेगवान राखायची असेल तर सर्व स्तरांवरील व्यवस्था निर्दोष राखण्याबाबत आपल्याला आग्रही रहावेच लागेल.**

# दहावी, बारावी तर सुरुवात आहे...!

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. काहींच्या परीक्षा मध्यात आल्या आहेत. दोन ते तीन पेपर होऊन गेलेले आहेत. मात्र कुठून तरी निराशा जनक बातम्या येत राहतात. अशावेळी विद्यार्थ्यांना सांगणे आहे की, विद्यार्थ्यांनो दहावी,बारावी इतर आयुष्याची सुरुवात आहे.या परीक्षा म्हणजे तुमच्या आयुष्याची शेवटची परीक्षा नाही. या परीक्षेला कोणतीही निराशा, दुःख, नैराश्य न बाळगता पुढे जा एखाद्या वर्षी एखादी परीक्षा देता आली नाही किंवा अपयश आले म्हणजे सर्वच संपत नाही जीवन हे सुरूच असते.

अनेक वेळा काही कारणास्तव काही विद्यार्थ्यांचे पेपर बरोबर जात नाहीत. किंवा अपेक्षित त्याला लिहिता येत नाही. काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादा पेपरही देता येत नाही. अशावेळी निराश होऊ नये. एखादी परीक्षा तुमच्या यशा अपयशाचे सूत्र ठरू शकत नाही आज ज्यांना यशस्वी म्हणून तुम्ही बघता त्यांनाही कधी काळी दहावी बारावी मध्ये अपयश आले होते. त्यामुळे या परीक्षेशिवाय मोठी लढाई आयुष्यात असून भयमुक्त व तणाव मुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जाणे हेच महत्त्वपूर्ण आहे.



**अपयश ही यशाची पहिली पायरी**

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. ही वेळ विद्यार्थ्यांसाठी तणावाची असते, अनेक ठिकाणी पालकांसाठीही पालकांनी बनवलेली ही परिस्थिती असते. अनेक प्रश्न डोक्यात असतात – पेपर कठीण जाईल का? चांगले गुण मिळतील का? अपयश आल्यास काय करायचे? मात्र, हे लक्षात ठेवले पाहिजे की अपयश हा शेवट नसतो, तर यशाकडे नेणारा एक टप्पा असतो.

**आकाश शिंदेचे उदाहरण पुढे ठेवा**

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील गुंटूर गावच्या आकाश शिंदेची कथा आजच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. बारावीच्या परीक्षेत तो तब्बल चार वेळा नापास झाला. त्याला अनेकांनी हिणवले, जवळच्याही मंडळीने त्याच्यावर टीका केली. मात्र, त्याने हार मानली नाही. अष्टपैलू मेहनत, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर त्याने आठ वर्षे संघर्ष केला आणि अखेर चझडउ परीक्षेत यश मिळवून महसूल सहाय्यक अधिकारी बनला.

आकाशची ही कहाणी स्पष्ट सांगते की, एक–दोन अपयशांनी आयुष्य थांबत नाही. अपयश आपल्याला अधिक परिपक्व आणि यशासाठी सज्ज करते. त्यामुळे एक–दोन पेपर कठीण गेल्याने निराश होण्याची गरज नाही. अपयश हे यशाचे पहिले पाऊल असते.

**अपयशातून शिकण्याचे धडे**

अपयश आले तर त्यावर रडत बसण्यापेक्षा त्यातून शिकले पाहिजे. थॉमस एडिसन यांनी बल्ब शोधण्यासाठी हजारो वेळा अपयश अनुभवले. जेव्हा लोकांनी त्यांना विचारले, तुम्ही हजार वेळा अपयशी झालात? तेव्हा ते हसून म्हणाले,

मी हजार वेळा अपयशी झालो नाही, तर मी हजार मार्ग शोधले जे चुकीचे होते.

त्याचप्रमाणे, बारावी किंवा दहावीच्या परीक्षेत अपयश आले तर त्याचा अर्थ तुमची क्षमता कमी आहे असे नाही, तर तुमची तयारी अजून सुधारण्याची संधी आहे. त्यामुळे आई – वडील, नातेवाईकांनी, स्नेहींनी तुमच्या भल्यापोटी काही बोलले असेल तर ते मनाला लावून घेऊ नका. जितके इनपुट तुम्ही तयार केले आहे. तितके आऊटपुट दिले जाईल. काही गोष्टी आपल्या हातात नसतात, त्यामुळे या परीक्षा देताना आलेल्या आकस्मिक गोष्टींना मनाला न लावून घेता पुढे चालणे सुरू ठेवावे.

**विद्यार्थ्यांसाठी काही महत्त्वाचे संदेश**

१. अपयशाने खचून जाऊ नका – अपयश म्हणजे पूर्णविराम नसून स्वल्पविराम आहे.

२. सकारात्मक मानसिकता ठेवा – मी करू शकतो हा विचार कायम ठेवा.

३. स्वतःच्या चुका ओळखा आणि सुधारणा करा – चुका ओळखून पुढच्या वेळी योग्य रणनीती आखा.

४. स्मार्ट स्टडी करा – पाठांतर न करता संकल्पनांची नीट समजूत करून अभ्यास करा.

५. निरोगी दिनक्रम ठेवा – योग्य आहार, पुरेशी झोप आणि मानसिक स्थिरता याला महत्त्व द्या.

६. योग्य मार्गदर्शन घ्या – शिक्षक, पालक आणि समुपदेशक यांच्याकडून मदत घ्या.

**धैर्य आणि आत्मविश्वास महत्त्वाचा**

आयुष्यात न थांबणाऱ्या प्रवाहासारखे रहा. काहीही झाले तरी प्रवास सुरू ठेवा.

जेव्हा तुम्ही हार मानता, तेव्हा प्रत्यक्षात तुमच्या यशाच्या संधीही संपतात. पण जर तुम्ही प्रयत्न करत राहिलात, तर तुमच्या यशाची शक्यता वाढत जाते.

**समुपदेशनाचा लाभ घ्या**

सध्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिली आहे. जर तुम्हाला एखादा पेपर कठीण गेला असेल, किंवा तुम्हाला नैराश्य वाटत असेल, तर घाबरून न जाता समुपदेशन केंद्रांशी संपर्क साधा. दरवर्षी परीक्षा येतात. संधी पुन्हा मिळते. त्यामुळे तणाव टाळा आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवा.

अंतिम विचार: यशाची गुरुकिल्ली

एक यशस्वी व्यक्ती आणि एक अपयशी व्यक्ती यांच्यात फक्त एकच फरक असतो – जो व्यक्ती अयशस्वी होतो, तो अपयश स्वीकारूनही जिद्द ठेऊन पुढे चालतो. आणि पुन्हा पुन्हा प्रयत्न करतो!त्यामुळे यशस्वी होतो. त्यामुळे प्रयत्न करणारा आज ना उद्या यशस्वी होणारच आहे.

आजचा पराभव उद्याच्या विजयासाठी आवश्यक असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भयमुक्त होऊन परीक्षांना सामोरे जावे, अपयशाने खचून जाऊ नये आणि आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करावी. यश तुमच्या हाती आहे – फक्त प्रयत्न सुरू ठेवा !

**तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची नियुक्ती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. लातूर विभागीय मंडळस्तरावर १० वी साठी ०२३८२–२५१६३३ तर १२ वीसाठी ०२३८२–२५१७३३ हा हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. मनात कोणताही ताणतणाव आल्यास या क्रमांकावर आपल्याला दूरध्वनी करता येईल.

**१० वी साठी हेल्पलाईन क्रमांक**

या हेल्पलाईनसाठी नियुक्त केलेले नावे व भ्रमणध्वनी पुढीलप्रमाणे आहेत. कुंभार ए.आर (सहाय्यक सचिव) मो.नं. ९४०५०७७९९१, उच्च माध्यमिक बारावी साठी कारसेकर जे. एस. (व.अ.) मो.नं. ९८२२८२३७८०, डाळींबे एम.यु. (प.लि.) मो.नं. ९४२३७७७७८९, जानकर एच.एस. (व.लि.) मो.नं. ९७६४४०९३१८ आहेत.

माध्यमिक (दहावी) साठी मो. नं. ९४२०४३६४८२, ९४०५४८६४५५, ७६२०१६६३५४ हे भ्रमणध्वनी आहेत. विद्यार्थी, पालक व शाळाप्रमुखांनी आपल्या अडीअडचणी विषयी दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क सकाळी ८ ते सायंकाळी ८ यावेळेत साधावा. तर १२ वी साठी ९३७१२६१५००, ९८६०९१२८९८,. ९८६०२८६८५७, ९७६७७२२०७१ असे मोबाईल नंबर असून त्याचा पालकांनी विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

**– प्रवीण टाके,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड**



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन कॅमेरा आणि माईकद्वारे हेरगिरी

डिजिटल युगात, स्मार्टफोन वापरकर्त्यांना गोपनीयतेचे उल्लंघन आणि डेटा चोरीचा धोका असतो. अनेक संशोधनांमधून असे दिसून आले आहे की स्मार्टफोन कॅमेरा, मायक्रोफोन आणि सर्च हिस्ट्री अशा वेगवेगळ्या मार्गांनी तुमची हेरगिरी करू शकतो.




अनेक स्मार्टफोन वापरकर्त्यांना असे वाटते की जर ते एखाद्या उत्पादनाबद्दल बोलले तर त्यांचा फोन त्याच उत्पादनाच्या जाहिराती दाखवू लागतो.

अशा परिस्थितीत, प्रश्न असा उद्भवतो की तुमचा स्मार्टफोन तुमचे ऐकत आहे की नाही हे कसे शोधायचे? स्मार्टफोनच्या कोणत्या सेटिंग्जद्वारे हेरगिरी रोखता येते? या बातमीत आम्ही तुम्हाला या सेटिंग्जबद्दल सांगत आहोत.

**या सेटिंग्जद्वारे हेरगिरी नियंत्रित करा**

तुमच्या स्मार्टफोनवरील अनेक ॲप्लिकेशन्सना तुमचा कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजमध्ये प्रवेश असतो. याद्वारे कोणताही ॲप तुमचे संभाषण ऐकू शकतो. हे टाळण्यासाठी, तुम्हाला तुमचा प्रवेश मर्यादित करावा लागेल किंवा फक्त निवडक परवानग्या द्याव्या लागतील.

**१. ॲप परवानग्या व्यवस्थापित करा**

तुमच्या फोनच्या सेटिंग्जमधील सुरक्षा आणि गोपनीयता पर्यायावर जा. येथे तुम्हाला प्रायव्हसीचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक करून परमिशन मॅनेजर वर जा. येथे सर्व ॲप्लिकेशन्सचा मायक्रोफोन ॲक्सेस दाखवला जाईल. तुमच्या गरजेनुसार ते व्यवस्थापित करा.

**२. सॉफ्टवेअर अपडेट ठेवा**

तुमच्या फोनचे सॉफ्टवेअर आणि ॲप्स अपडेट ठेवा. तुमच्या फोनचा सुरक्षा पॅच दर महिन्याला अपडेट करा.

**३. व्हॉइस असिस्टंट अक्षम करा**

फोनवर सिरी, गुगल असिस्टंट किंवा अलेक्सा सारखे व्हर्च्युअल असिस्टंट बंद करा. यामुळे फोनमध्ये आवाज ऐकणे टाळता येते.

४. असुरक्षित सार्वजनिक वाय–फाय वापरणे टाळा

सार्वजनिक वाय–फाय नेटवर्क आणि हॉटस्पॉट्स हॅकिंगचे साधन बनू शकतात. हे टाळण्यासाठी, असुरक्षित सार्वजनिक वाय–फाय वापरताना तज्ञछ वापरा.

**५. थर्ड पार्टी ॲप्सचे निरीक्षण करा**

अज्ञात थर्ड पार्टी ॲप्स डाउनलोड करणे टाळा. फक्त अधिकृत ॲप स्टोअरमधून ॲप्स इन्स्टॉल करा. इंस्टॉलेशननंतर, ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या द्या.

# लेखक प्रा. पुरुषोत्तम सहस्रबुद्धे



## निमित्त

प्राध्यापक पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे हे लेखक आणि मराठी विषयात पीएचडी मिळविणारे पहिले अभ्यासक होते. हिंदू धार्मिक परंपरा आणि सनातनांवर त्यांनी टीका केली.

पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे मराठीचे प्राध्यापक होते. समाजात ते विद्वान म्हणून ओळखले जात होते. लेखक म्हणून त्यांनी शैक्षणिक संशोधनांपासून काल्पनिक लेखनापर्यंत विविध साहित्यप्रकार हाताळले आहेत. त्यांचा जन्म १० जुन १९०४ साली पुण्यात झाला. त्यांनी सुरुवातीचे शिक्षण पुण्यातच, तर नंतरचे शिक्षण मुंबई विद्यापीठातून घेतले. सहस्रबुद्धे यांच्या सुरुवातीच्या काळातील, तसेच जडणघडणीच्या वयातील फारशी माहिती उपलब्ध नाही; तरीही त्यांची कारकीर्द आणि त्यांना लाभलेले सार्वजनिक मानसन्मान यांच्या नोंदी मात्र आहेत. त्यांच्याकडून शिकलेल्यांची, तसेच त्यांच्या समकालीन लोकांची प्रशंसापत्रेही आहेत. त्यांचे पुत्र सुहास सहस्रबुद्धे यांनी हा माहितीचा ठेवा सर्वांसाठी खुला ठेवला आहे.

मराठी विषयात पीएचडी प्राप्त करणारे ते पहिलेच तज्ज्ञ होते, असे समजले जाते. ते उत्तम शिक्षक म्हणून ओळखले जात. त्यांनी १९२८ ते १९४३ या काळात पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात शिकविण्याचे काम केले, तर १९४३–१९६४ या काळात पुण्याच्या परशुरामभाऊ महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये आणि साहित्य वर्तुळात ते डॉक्टर या नावाने परिचित होते. मुंबई विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट पदवी संपादन केल्याने त्यांना तसे म्हटले जाई. सहस्रबुद्धे यांनी आपल्या कारकिर्दीत काही नाटके लिहिली. लोकशाही, हिंदू समाज आणि हिंदूंची राजकीय प्रतिमा, सामाजिक जीवनातील तर्कनिष्ठेचे महत्त्व, तत्त्वज्ञान व राष्ट्रीयत्व यांच्यातील विरोधाभास अशा अनेक विषयांवर अतिशय विपुल प्रमाणात निबंध लेखनही केले. त्यांना रामायण व महाभारतातील पौराणिक राजकारणाचे आकर्षण होते. त्याचा ते आपल्या लेखनात पुरेपूर वापर करत; उदाहरणार्थ भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म हा त्यांचा निबंध (१९६५). त्यांचे माजी विद्यार्थी विद्याधर पुंडलिक यांनी सहस्रबुद्धे यांच्यावर निबंध लिहिला आहे. सहस्रबुद्धे यांनी धार्मिक अंधश्रद्धांबद्दल केलेल्या टिकात्मक लेखनाचा ऊहापोह 'महाराष्ट्रातील ग्रीक शिक्षक: डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे' असे शीर्षक असलेल्या या निबंधात आहे. परंपरा व अनुसरण याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात असलेले कोडे ते कसे सोडवीत, या विषयीही या निबंधात आहे. १९३० ते ४०च्या काळात मूलगामी तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सहस्रबुद्धे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे आकर्षित झाले होते.

उजव्या विचारसरणीच्या या हिंदुत्ववादी संघटनेकडे ते कसे गेले, याचे वर्णन यात आहे. कालांतराने मात्र त्यांचा 'आरएसएस'च्या मार्गांबाबत भ्रमनिरास झाला व त्यांनी संघाला १९४० च्या दशकात रामराम ठोकला. सहस्रबुद्धे यांचे काही प्रबंध खूपच गाजले.

सहस्रबुद्धे यांनी उतारवयातही अभ्यास मंडळांच्या माध्यमातून लिखाण आणि अध्यापन चालूच ठेवले होते. त्यांचे ४ मार्च १९८५ साली पुण्यात निधन झाले

(सौजन्य: टाटा टेक्नॉलॉजीस)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# कॉफीऐवजी 'ही' हेल्दी पेये तुम्हाला देतील ऊर्जा

परीक्षा जवळ आली की, आपल्यातील अनेकांना टेन्शन येण्यास सुरुवात होते. काही जण परीक्षेच्या काही महिन्यांअगोदर अभ्यास करण्यास सुरुवात करतात. तर काही अगदी पेपरच्या एक दिवस आधी संपूर्ण रात्र जागे राहून परीक्षेची तयारी करतात... यादरम्यान मुलाने वा मुलीने व्यवस्थित जागे राहून अभ्यास करावा यासाठी पालक त्यांना चहा किंवा कॉफी बनवून देतात. परीक्षेच्या काळात कॉफी ही खरी जीवनरक्षक आहे, असे म्हणतात. पण, निरोगी आहाराशिवाय तुम्हाला या दिवसांमध्ये बेस्ट रिझल्ट मिळणे कठीणच असते. तर हेच लक्षात घेऊन सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट पूजा मखिजा यांनी कॉफीऐवजी काही आरोग्यदायी पर्याय शेअर केले आहेत.



परीक्षेची तयारी करण्याच्या तणावपूर्ण काळात तुम्हाला ऊर्जा पातळी टिकवून ठेवणे आवश्यक असते. तेव्हा कॅफिनमुळे तीव्र ऊर्जा क्रॅश होऊ शकते. त्यामुळे डिहायड्रेशनचा सामना करण्यासाठी सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट पूजा माखिजा हिने ताज्या लिंबाचा सोडा, काही पुदिन्याच्या पानांसह संत्रे आणि लिंबाचा रस किंवा इलेक्ट्रोलाइटयुक्त नारळाचे पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे.

सोडादेखील पिऊ नये बंगळुरू येथील क्लिनिकल न्यूट्रिशन अँड डायटेटिक्सच्या सेवा प्रमुख एडविना राज सांगतात, कॅफिन हा जास्त भार लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ म्हणून काम करतो आणि तुमच्या शरीरातून पाणी काढून टाकतो, ज्यामुळे निर्जलीकरण होते. त्यामुळे या काळात कॅफिनचा समावेश संयम राखून करावा.

तसेच कॅफिन जर माफक प्रमाणात समाविष्ट करायचे असेल, तर फळांनी भरलेले पाणी, आवळा व तुळशीच्या गोळ्या यांसारख्या नैसर्गिक पेयांमध्ये अँटिऑक्सिडंट्सच्या वाढीसह हायड्रेशनच्या अतिरिक्त स्रोतासह एकत्र केले पाहिजे. फळांचे स्मूदी, भाज्यांचे सूप, नारळाचे पाणी, हळद व मिरपूड घालून तयार केलेले ताक हे द्रवरूप पदार्थ डिहायड्रेशन टाळण्याचे काम करतात. अगदी मॅच लॅटमध्ये कॅफिनचा एक छोटा डोस असतो. अशा प्रकारे, तुम्ही परीक्षेची तयारी करताना सोडा किंवा साखरयुक्त पेये टाळणे तितकेच महत्त्वाचे आहे. तसेच फळे, भाज्या व पालेभाज्या, नट्स आणि बियांमध्ये असलेले ओमेगा–३ स्रोतांमधील अँटिऑक्सिडंट्सद्वारे पोषण देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

# सोयीस्कर ठिकाणी एचएसआरपी सेंटर सुरू करण्याची मागणी

**खोपोली खालापुर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या वतीने ३१ मार्च २०१९पर्यंतच्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसवण्याचे निर्देश दिलेले आहेत शासनाने नियुक्त केलेल्या अधिकृत फीटमेंट सेंटरवर अपॉइंटमेंट घेऊन अधिकृत विक्रेत्याकडूनच एच.एस.आर. पी.नंबर प्लेट घ्यावी असे परिवहन शाखेने सुचवलेले आहे.सदर फिटमेंट सेंटर निश्चित करताना शासनाने नागरिकांना सोयीचे होईल असे ठिकाण न दिल्याने नाहक आर्थिक, मानसिक,शारीरिक त्रास सहन करावा लागणार आहे.



महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या वतीने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एच.एस.आर.पी.) बसवण्याचे निर्देश दिलेले आहेत.१ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर या नंबर प्लेट आहेत.त्यामुळे ३१ मार्च २०१९ पर्यंत सदर नंबर प्लेट नसलेल्या वाहनांना ३१ मार्च २०२५ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करावी अन्यथा ढ्ढज कडून दंड आकारण्यात येईल असा इशारा परिवहन शाखेकडून देण्यात आलेला आहे.०१ एप्रिल २०१९ नंतर नोंदणीकृत वाहनांवर हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट आधीच बसविण्यात आलेली आहे.त्यामुळे या वाहनांना बसवण्याची गरज नाही.

०१ एप्रिल २०१९ नंतरच्या वाहनांना एच.एस.आर.पी. नंबर प्लेट बसविलेल्या आहेत.या विशेष प्रकारच्या अल्युमिनियम पासून बनलेल्या असून त्यावर परावर्तित रंग आणि युनिक आयडेंटीफिकेशन कोड असतो.या प्लेट्स सीसीटीव्ही कॅमेराद्वारा सहज ओळखल्या जाऊ शकतात. त्यामुळे वाहन चोरी आणि बनावटगिरी रोखण्यास मदत होते असे प्रादेशिक परिवहन शाखेचे म्हणणे आहे.या नवीन नंबर प्लेट साठी दुचाकी आणि ट्रॅक्टर साठी ४५० रुपये व जीएसटी कर, तीन चाकी वाहनासाठी ५०० रुपये व जीएसटी कर, तसेच चार चाकी गाडीसाठी ७४५ रुपये व जीएसटी कर आकारण्यात येणार आहे.

शासनाने नियुक्त केलेल्या अधिकृत फीटमेंट सेंटरवर अपॉइंटमेंट घेऊन अधिकृत विक्रेत्याकडूनच एच.एस.आर. पी.नंबर प्लेट घ्यावी असे परिवहन शाखेने सुचवलेले आहे.सदर फिटमेंट सेंटर निश्चित करताना शासनाने नागरिकांना सोयीचे होईल असे ठिकाण देणे अत्यंत गरजेचे आहे.कर्जत खालापूर तालुक्यासाठी पनवेल सेंटर निश्चित केले आहे.त्यामुळे नागरिकांना नाहक आर्थिक, मानसिक,शारीरिक त्रास सहन करावा लागणार आहे.विशेषतः महिला वर्ग दुचाकी धारकांना सदर गाडी घेऊन जाणे जिकरीचे ठरणार आहे.यातून होणाऱ्या मानसिक त्रासासोबत अपघात होण्याचे व जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही.

संघर्ष समितीच्या माध्यमातून आरटीओ ला विनंती करण्यात आलेली आहे की सदर नंबर प्लेटसाठी खोपोली, खालापूर,कर्जत याठिकाणी सेंटर दयावे अथवा कॅम्प आयोजित करून सदर नंबर प्लेट बसविण्याची सुविधा करून दयावी जेणेकरून नागरिकांना सोयीचे होईल.

या मागणीचा विचार करून आरटीओने नागरिकांना सहकार्य करावे.योग्य ती जनजागृती करावी. लाखोंच्या वरती असणाऱ्या वाहनांची संख्या लक्षात घेता यास मुदतवाढ द्यावी तसेच स्थानिक ठिकाणी कॅम्प करण्याची सुविधा दयावी अथवा काही सेंटर्स उपलब्ध करावे अन्यथा नागरिकांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघर्ष समितीने दिला आहे.

# हरिहरेश्वरमध्ये मूर्ती विसर्जित करताना गाडी समुद्रात बुडाली

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील साळवे गावातील काही ग्रामस्थ हरिहरेश्वर येथील समुद्रकिनाऱ्यावर सोमवारी सकाळी ११ वाजता जुन्या मुर्त्या विसर्जित करण्यासाठी आले होते. त्या वेळी पाण्याचा अंदाज न घेतल्यामुळे पीकअप वाहन वाळूमध्ये रुतले. याच वेळी, पाण्याचा प्रवाह वाढल्याने वाहन पूर्णपणे पाण्यात बुडाले. साळुंखे रेस्क्यू टीमच्या मदतीने ते बाहेर काढण्यात आले.



साळवे गावच्या ग्रामस्थांसह सुधीर काळूराम तेटगुरे, बाबूजी नारायण तेटगुरे, सिताराम कोंडू तेटगुरे, सिताराम भागुजी तेटगुरे, गणू गोपाळ तेटगुरे, दिनेश भागोजी जाधव, गोविंद केरू तेटगुरे हे हरिहरेश्वर येथे जुन्या मुर्ती विसर्जित करण्यासाठी आले होते पीकअप वाहन समुद्राच्या काठावरून पाण्याच्या क्षेत्रात जात असताना, पाण्याचा अंदाज न घेतल्यामुळे पीकअप वाहन वाळूमध्ये रुतले. याच वेळी, पाण्याचा प्रवाह वाढल्याने वाहन पूर्णपणे पाण्यात बुडाले.

साळुंखे रेस्क्यू टीमला या घटनेची माहिती मिळताच, सुकृत कोलथरकर, प्रथमेश कोलथरकर, सार्थक मयेकर, रुपेश मयेकर, सार्थक बोरले, अमर कवडे, धीरज बोरकर, स्वप्निल कोलथरकर आणि अनिकेत मयेकर या टीमने त्वरित मदतीला धाव घेतली पिकअप झाडाला बांधलेल्या रस्सीचे साहाय्य घेत, पाण्याच्या वाढत्या प्रवाहाला तोंड देत, या टीमने पिकअपला धरण्याचा अथक प्रयत्न केला.

पीकअप पूर्णपणे पाण्यात बुडाल्यामुळे, ओहोटीच्या वेळी रस्सीच्या सहाय्याने सहकाऱ्यांच्या मदतीने पीकअप सुखरूपपणे बाहेर काढण्यास यश मिळवले. या वेळी पीकअप मालक सुधीर तेटगुरे आणि साळवे गावच्या ग्रामस्थांनी रेस्क्यू टीमचेआभार मानले.

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात २१ रुग्णांना मिळाली नवी दृष्टी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा सिटिझन फोरम आयोजित मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात सोमवारी ७६ नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २१ रुग्णांना आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

रोहा सिटिझन फोरमने शिबिराच्या माध्यमातून अडीच हजार पेक्षा जास्त नेत्ररुग्णांच्या मोफत आणि यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत मोतीबिंदूमुक्त रोहा या ध्येयाने रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट सातत्याने 'अंधत्वाकडून दृष्टीकडे' हे अभियान राबवत आहे.

रोहा येथे सोमवारी सलग ३४वे नेत्ररुग्ण शिबीर झाले. तपासणी केल्यानंतर एका दिवसात डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या जात असल्याने गरजूंना दिलासा मिळत आहे. या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीमने रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, अप्पा देशमुख, मिलिंद अष्टिवकर, महेश सरदार, संदीप सरफळे, आदींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.


## कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड.

**ई-निवीदा सूचना (बांधकाम विभाग)**

जावक क्रमांक/कनप/ बांधकाम विभाग/३०८६/२०२४-२५ दि. २८/०२/२०२४

कर्जत नगरपरिषदेच्या वतीने कर्जत नगरपालिका हद्दीतील खालिल प्रमाणे विकास कामे करुन घेण्याची आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील गुरुनगर येथे जाणारा डी. पी. रस्ता बनविणे. | २,१९,४२,३४५/- |

सदर कामाची ई-निविदा, अटी व शर्ती आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक व इतर तपशिलासह सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०३/०३/२०२५ सकाळी ११.०० वा पासून उपलब्ध होईल. त्याकामी इच्छुक ठेकेदारा कडुन निविदा मागविणेंत येत आहेत.

सही/-
(श्री. वैभव गारवे)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८१/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची (सामाईक सुविधा केंद्र) देखभाल व दुरूस्ती..... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र इमारतीकरीताच्या वीजपुरवठा नेटवर्कचे मजबूतीकरण व सुधारणा करणे. | ₹ ३९,३३,९११.०० |
| २. | विळे भागड (ग्रोथ सेंटर) औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील जॅकवेल येथे नदीकाठची झिज टाळण्यासाठी व संरक्षणाकरीता गॅबियन भिंत बांधणे. | ₹ ३९,६८,०२८.०० |
| ३. | पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील अशुद्ध व शुद्ध जल उदंचन केंद्रामध्ये रिंग मेन युनिटचा पुरवठा करणे, उभारणे व कार्यान्वित करणे . | ₹ ३२,७९,७७३.०० |
| ४. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा येथील फेज -२ सांडपाणी उदंचन केंद्रातील ३८० केव्हीए डीजी सेटची दुरुस्ती व इंधन पंप कॅलिब्रेशन करणे. | ₹ ५,७८,५७५.०० |
| ५. | विळे भागड ग्रोथ सेंटर येथील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील उर्ध्व व गुरुत्व जलवाहिन्यांची व जल वितरण वाहिन्यांची वार्षिक तत्वावर सन २०२४-२५ करीता देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३७,५५,८९६.०० |
| ६. | खांदा कॉलनी येथील निवासी इमारतींची देखभाल व दुरूस्ती...... खांदा कॉलनी पनवेल येथे निवासी कर्मचारी निवासस्थानांची अंतर्गत दुरुस्ती करणे. | ₹ २१,०५,३२१.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०५/०३/२०२५ ते दिनांक १९/०३/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/०३/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/०३/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल अल्लेरइंडिया डेव्हलपर्स एल एल पी यांनी मिळकतीचे मालकांकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे अजिवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मालकाचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| **समस्त गावकरी लोक व.** १. पांडूरंग हाशा शेडगे, २. सिताराम पांडूरंग मालकर, ३. आदिनाथ कानू गायकर, ४. ज्ञानेश्वर धोंडू बडे, ५. पांडूरंग नथू माळी, ६. बळीराम बाबू पाटील, ७. बाळकृष्ण रामचंद्र राऊत, ८. रमेश लडकू माळी, ९. राजेश रामा वरे, १०. लहू विठ्ठल पाटील, ११. वसंत कानू सार्डेकर, | १७१ | १-२५-०० पो.ख.०-०३-०० | ०५.७० |
| | **एकुण क्षेत्र** | **१-२८-००** | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक ०३/०३/२०२५

सही/-
**ॲड. अमोल. दिगंबर पवार**

पत्ता : पहिला मजला, अश्वमेध, सेक्टर १२, प्लॉट १२, नवीन पनवेल जि. रायगड ४१० २०६. मो. क ९८३३७३७९२२



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे - उमरोली ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - उमरोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| उमरोली | तुकाराम गणपत पाटील | २४ | ६ | १-४५-७० ०-०९-९० एकूण -१-५५-६० | १४.०७ |

**सदर जमिन मिळकतीपैकी तुकाराम गणपत पाटील यांच्या हिश्यातील ०-६५-७० पो. ख ०-०९-९० पैकी ०-१६-०० गुंठे जमिनीबाबत जाहीर नोटीस**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

ता. ०३/०३/२०२५
पनवेल

सही/-
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**

१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२



## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ९९ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | म्हासांडी कोरखंडे किस्ताकेतकी निगुडशेत आणि रा.मा. ९७ ते मेढे रा.मा ९१ ते प्राजिमा ८१ मध्ये कि.मी. १४/२०० मध्ये पुनर्बांधणी करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | १४२५३६८ | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| २ | म्हासांडी कोरखंडे किस्ताकेतकी निगुडशेत आणि रा.मा. ९७ ते मेढे रा.मा ९१ ते प्राजिमा ८१ मध्ये कि.मी. १४/४०० मध्ये पुनर्बांधणी करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | १२६२७९५ | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ३ | म्हासांडी कोरखंडे किस्ताकेतकी निगुडशेत आणि रा.मा. ९७ ते मेढे रा.मा ९१ ते प्राजिमा ८१ मध्ये कि.मी. १२/२०० मध्ये पुनर्बांधणी करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | १२०७६५२ | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ४ | मौजे कुरवडे ता. माणगांव येथे स्मशानभुमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२७१५६७ | १३०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| ५ | गांगवली तोंडलेकरवाडी सेथे सभामंडप बांधणे ता माणगाव जि रायगड | ११०३६२५ | सु.बे. | ५९०/- | ६ महिने | सु.बे. |
| ६ | मौजे मुठवली बौध्दवाडी येथे संरक्षण भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८१३६६६ | ९०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात |
| ७ | मौजे नांगाव बौध्दवाडी येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८१५९२४ | ९०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०३/०३/२०२५ (सकाळी १०.०० पासून)** ते दिनांक **१०/०३/२०२५ वेळ १८.००** वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जि.रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१२/०३/२०२५** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/७७५**
**दिनांक : २८/०२/२०२५**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/३५८**

सही/
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


# अज्ञात मृतदेहाची ओळख पटवण्याचे खालापूर पोलिसांचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

३० जानेवारी रोजी मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या कलोते गावाचे हद्दीत राजस्थान ढाब्याच्या स्वच्छतागृहाजवळ ३५ ते ४० वयाच्या इसम मृतावस्थेत आढळून आला होता. अंगात निळा स्वेटर आणि काळ्या रंगाची विजार असा पेहराव असलेला व्यक्ती मृत अवस्थेत याअज्ञात व्यक्तीबद्दल माहिती असल्यास खालापूर पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन सहाय्यक फौजदार सुभाष म्हात्रे यांनी केले आहे.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका. | २ सप्तपर्णी, ६ रेन ट्री, २. नारळ, २ अशोका, १ आंबा, १ जांभुळ, १ शेवगा व १ जाम अशी एकूण १६ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती-क मधील लायन्स गार्डन्स ते तहसील ऑफीस ते HOC कॉलनी (अ.भु.क्र. ३३ ते ५२२/२, २९/३, २९/५, २९/६, २१, ५३०, ५३४, ५३६, ५३७) पर्यंत गटर बांधकाम व रस्ता बांधकामात १६ झाडे बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.८६/८६/२०२५
दिनांक : ०३/०३/२०२५

सही/-
**(स्वरुप खारगे)**
उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका

## निवडक



### विद्यालयात शौचालयांची सुविधा

**पनवेल :** शनिवार एक मार्च रोजी जनसेवा संघ संस्थेच्या नेरे हायस्कूल, पनवेल येथे नृत्यांजली संस्था भांडुप, मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी चार शौचालय बांधून दिले. नृत्यांजली संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार गुहा यांच्या अध्यक्षतेखाली प्रीती कुमारी कंट्री हेड, एनओव्ही यांच्या निधीतून आणि संस्थेचे सदस्य अनोना गुहा, गिरीश दळवी, माजी नगरसेविका चारुशीला समजिसकर आणि जनसेवा संघ संस्थेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण गवते, सचिव टी.डी म्हात्रे यांच्या उपस्थितीत शौचालयाचे उद्घाटन पार पडले. या वेळी वाजे हायस्कूल मुख्याध्यापक माळी सुरेश आणि नेरे हायस्कूल मुख्याध्यापक धोत्रे डी. एस यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

### १० मार्चला लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार १० मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

### पनवेलमध्ये रविवारी काव्य मैफल

**पनवेल :** महिला दिनाचे औचित्य साधून ९ मार्च सायंकाळी ६:३० वाजता तीच्यापासून तीच्यापर्यंत या महिलांचे विविध पैलू उलगडणाऱ्या भावपूर्ण काव्यमैफिलीचे श्रीलक्ष्मीनारायण मंदिर पनवेल (सिकेपी हॉल) येथे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण काव्यमैफिलीत दर्जेदार काव्यप्रतिभा लाभलेल्या कवयित्रींचा सहभाग असणार आहे. या महिलांच्या गौरवास्पद काव्यरचना आपणास नक्कीच अंतर्मुख करतील. कार्यक्रमाकरता रसिक श्रोत्यांस आग्रहाचे निमंत्रण रसिक हो प्रस्तुती, पनवेलच्या ईशा पत्की, आशना चौबळ यांनी दिले आहे.

### संतोषसिंग डाबेराव यांना सेवानिरोप



**उरण :** पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव हे आपल्या २८ वर्षांच्या सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवकांच्या उपस्थितीत, उरण पंचायत समितीच्या कार्यालयात झाला. पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून २७ वर्ष तर सेवेतील एक वर्ष सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी सेवा बजावली. अशी एकूण २८ वर्ष त्यांनी सेवा बजावली. कार्यक्रमासाठी उरण पंचायत समितीच्या कर्मचारी, अधिकारी व तालुक्यातील ग्रामसेवकांनी विशेष मेहनत घेतली.

# हिवताप रोखण्यासाठी जनजागृती

## ■ डास उत्पत्ती स्थानांच्या ठिकाणी शिबिरांचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप अथवा डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत महाशिवरात्री निमित्त नमुंमपा कार्यक्षेत्रामधील शिव मंदिर परिसरामध्ये विशेष हिवताप अथवा डेंग्यू जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप अथवा डेंग्यू आजारांबाबत व डासउत्पत्ती स्थानांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.



शिबिरांचे आयोजन करून एकुण नऊ हजार २५८ नागरीकांना हिवताप अथवा डेंग्यु आजाराविषयक जनजागृती करण्यात आली असुन त्यामध्ये एकुण १४६ रक्तनमुने घेण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा सत्र न्यायालय, सेक्टर-१५, सीबीडी येथे केलेल्या हिवताप अथवा डेंगी जनजागृती शिबिरांकरीता एकुण ४११ न्यायाधीश, वकिल, अधिकारी, कर्मचारी, व न्यायालयात येणाऱ्या नागरीकांकरीता लाभ घेतला आहे.

जिल्हा सत्र न्यायालय, सेक्टर-१५, सीबीडी येथे न्यायालयातील न्यायाधीश, वकिल, अधिकारी, कर्मचारी, व न्यायालयात येणाऱ्या नागरीकांकरीता विशेष हिवताप अथवा डेंग्यू जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई महापालिकेमार्फत साप्ताहिक वेळापत्रकानुसार दैनंदिन डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरिकरणाचे काम केले जाते, परंतु हिवताप अथवा डेंग्यू नियंत्रणामध्ये नागरीकांना प्रत्यक्ष आणि सक्रीय सहभाग असणे आत्यंत आवश्यक असल्याने विविध सणांचे निमित्ताने साधून हिवताप/डेंग्यू जनजगृती शिबिर आयोजित करण्यात येतात.

सदर शिबिरांचे वैशिष्टय म्हणून नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवुन, तसेच नागरीकांना डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून, घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने उदा. पाणी साठवुन ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंधिस्त करणे, त्याबरोबर पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंधिस्त करणे व आठवड्यातुन एक दिवस स्वच्छ करुन कोरडे ठेवणे अथवा भंगार साहित्य टायर्स इत्यादी नष्ट करणे अथवा छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचु देवु नये व ताप येताच त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घेणे या बाबत नागरीकांना प्रोत्साहित करुन, जनजगृती करण्यात आली.

> **हिवताप अथवा डेंग्यूसाठी कारणीभूत नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्ती घरांमध्ये व घराभोवतालील स्वच्छ पाण्यात होते. त्यामुळे सर्व पाण्याचे साठे झाकून ठेवणे व घराबाहेरील अथवा टेरेसवरील भंगार नष्ट केले तर नवी मुंबईत हिवताप अथवा डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल.**
> **-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, मनपा**

# गुंतवणुकीमध्ये परताव्याचे आमिष दाखवून एक कोटींची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

साखळी पद्धत मार्केटिंग कंपनी स्थापन करुन गुंतवणुकीवर तीन पट रकमेचा परतावा देण्याचे आमिष दाखवले आणि परतावा न देता एक कोटी एक लाख ४७ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सुनील विश्वकर्मा, संतोष शिर्के, नाना राणे व केशव पावसकर यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

नीलम मुस्के या पनवेल, करंजाडे येथे राहत असून यांच्या ओळखीचे केशव पावस्कर यांनी साखळी पद्धत मार्केटिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यांनी स्काय मंत्रा व स्काय एंजल नावाच्या मार्केटिंग कंपनीत पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले. यावेळी वर्षभरात गुंतवणूक केलेल्या रकमेवर तीन पट परतावा मिळेल असे सांगितले. त्यानंतर त्यांनी कंपनीचे मालक सुनील विश्वकर्मा व संतोष शिर्के यांच्या बद्दल माहिती दिली आणि संतोष शिर्के यांच्यासोबत करंजाडे येथे भेट करून दिली आणि विश्वकर्मा यांच्यासोबत व्हिडिओ कॉल करून ओळख केली. प्रत्येकाने अधिक सदस्य जोडल्यास कंपनी जास्त परतावा देईल असे आश्वासन दिले व सदस्य जोडण्यास सांगितले.

यानुसार त्यांनी त्यांच्या नातेवाईकांना कंपनी चांगली असल्याचे सांगून स्कीम बद्दल माहिती दिली. या वेळी त्यांनी पैशांची गुंतवणूक केली. त्यानंतर दागिने गहाण ठेवून कॉइनमध्ये गुंतवणूक केली. काही दिवसांनी कंपनीच्या अकाउंट मध्ये ऑडिटचा प्रॉब्लेम चालू असल्याचे पावसकर आणि शिर्के यांनी सांगितले. त्यानंतर फोन देखील घेतला नाही. काही दिवसांनी दोन्ही कंपन्या गुंतवणूकदारांना परतावा न देता बंद केल्याचे समजून आले. तब्बल ३० जणांचे एक कोटी एक लाख ४७ हजार रुपये घेऊन परत न केल्याप्रकरणी चौघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सेंट जोसेफ विद्यालयात मराठी राजभाषा दिन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी साहित्यातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे मराठी साहित्यिक कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सेंट जोसेफ विद्यालयात राजभाषा दिन जल्लोषात साजरा करण्यात आला.

मराठी दिनाच्या निमित्ताने एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. मराठमोळी वेशभूषा करून मुलांनी सादरीकरण केले. कुसुमाग्रजांच्या कवितांचे पठण करून त्याचे सादरीकरण करण्यात आले. मराठी पोवाडा सादरीकरणाने मराठी संस्कृतीची ओळख करून दिली पारंपारिक पोशाख परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी खास नृत्याने कार्यक्रमाची शोभा वाढवली. मराठी दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी काही विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली.

मराठी दिनाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीसे प्रदान करण्यात आली. संस्थेचे संस्थापक डॉ. ए. एफ. पिंटो तसेच संस्थेच्या संचालिका डॉ. ग्रेस पिंटो यांच्या प्रेरणेद्वारे सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# परिणीता सन्मान पुरस्काराबाबत आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिणीता सोशल फाऊंडेशन या संस्थेचा परिणीता सन्मान हा पुरस्कार सोहळा मार्च २०२५मध्ये आयोजित करण्यात येत आहे. या पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून या पुरस्कारासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत.

परिणीता सन्मान या पुरस्कारासाठी खालील विभागातून अर्ज करू शकता. वैद्यकीय (किमान ५ वर्ष अनुभव, स्वतःचे क्लिनिक असल्यास प्राधान्य) ज्योतिष तज्ज्ञ (किमान ५ वर्ष कार्यरत) सीए (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) वकिल (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) आर्किटेक्ट (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) रियल इस्टेट (स्वत:ची फर्म असल्यास प्राधान्य) शिक्षण (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) हॉटेल व्यवसाय (स्वतःचे हॉटेल असल्यास प्राधान्य) घरगुती उत्पादने (किमान ५ वर्षांचा अनुभव, स्वत:चे उत्पादन) कापड व्यवसाय (स्वतःचे वर्कशॉप / शोरूम असल्यास प्राधान्य) ज्वेलरी व्यवसाय (स्वतःचे शोरूम असल्यास प्राधान्य) फॅशन डिझायनिंग (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) ब्युटी पार्लर (किमान ५ वर्षांचा अनुभव, स्वतःचे पार्लर असल्यास प्राधान्य) पायलट (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) या विभागातून प्रत्येकी तीन नामांकने घोषित होणार असून त्यापैकी एकाला या वर्षीचा परिणीता सन्मान प्रदान होतील.

खालील विभागातून अर्ज करू शकता. अभिनेत्री (किमान ५ वर्षांचा अनुभव, व्यावसायिक महिला कलाकार) मॉडेल (ब्रँड अँबेसिडर्स असल्यास प्राधान्य) नर्तिका (विशारद परीक्षा उत्तीर्ण आवश्यक, व्यावसायिकांना प्राधान्य) गायिका (विशारद परीक्षा उत्तीर्ण आवश्यक, व्यावसायिकांना प्राधान्य) महिला लेखिका (किमान ५ वर्षांचा अनुभव, व्यावसायिक लेखिकांना प्राधान्य) निर्माति-दिग्दर्शिका (किमान ५ वर्षांचा अनुभव, व्यावसायिकांना प्राधान्य) राजकारणी महिला (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) पोलीस अधिकारी (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) शासकीय अधिकारी (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) वृत्तनिवेदिका (किमान ५ वर्षांचा अनुभव, कार्यरत) महिला एन्फ्लुएन्सर (1M Followers Required). या विभागांसाठी मानांकने जाहीर होणार नाहीत तर आलेल्या अर्जातून थेट पुरस्कार घोषित होणार आहेत.

या पुरस्कारासाठी अर्ज करणारी महिला परिणीता सोशल फाऊंडेशनची सदस्या असणे बंधनकारक आहे. परिणीता सोशल फाऊंडेशनची वार्षिक सभासद फी या वर्षीपासून ६०० रुपये आहे.

ज्या व्यावसायिका या पुरस्कारासाठी अर्ज करणार आहेत त्याच्याकडे त्यांच्या व्यवसायासंबंधीत अधिकृत कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. पुरस्कारासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १० मार्च २०२५ आहे. त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारता येणार नाहीत. पुरस्कारासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उद्योजिकांनी त्वरीत परिणीता सोशल फाऊंडेशन ९६१९९४९८४३ प्रसाद हनुमंते ७६६६३२७००९ किंवा वेदांग सागवेकर ८८५०१२१५४८ या संपर्क क्रमांकावर व्हॉटसअॅप मेसेज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगावा -अभिषेक बोराणा

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय विज्ञान दिन विद्याभवन शैक्षणिक संकुल नेरूळमध्ये २८ फेब्रुवारी रोजी साजरा केला. ज्याचा उद्देश विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भारतीय शास्त्रज्ञांनी केलेल्या योगदानाची ओळख करून देणे आणि समाजात विज्ञानाबद्दल दृष्टिकोन व जागरूकता वाढवणे हा आहे.

बीएआरसीचे नामांकित शास्त्रज्ञ अभिषेक बोराणा यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने 'content is the king' विद्यार्थ्यांबरोबर वार्तालाप साधला. गोष्टीद्वारे 'जो हम ढूँढते हैं, वो हमारे अंदर ही है ' सतत वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.


संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी ' जय जवान, जय किसान,जय विज्ञान' नारा देत आपल्या सभोवताली असलेल्या विज्ञानातील विविध घटकांचे उदाहरण देत 'वैज्ञानिक दृष्टिकोन' अंगी बाळगण्याचा सल्ला दिला. आपल्या दैनंदिन जीवनाची सुरुवात विज्ञानामुळे होते असेही त्यांनी सांगितले. अंबरनाथ येथील ओंकार कुऱ्हाडे यांनी सेमीकंडक्टर बाबत मिळवलेल्या पेटंटची माहिती दिली. मिनि सायन्स लॅब मधून प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे.



विज्ञान सहशिक्षिका शितल येंगे यांनी विज्ञानाबद्दल जागरूकता आणि रुची वाढवण्यासाठी प्रेरित केले. नवोपक्रमाला प्रोत्साहन मिळावे म्हणून विज्ञान प्रदर्शन, प्रश्नमंजुषा आणि चर्चासत्रांचे आयोजन केले होते. ज्याद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या महत्त्वाबद्दल जागरूक केले. इंटर हाऊस प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली तसेच विजेते विद्यार्थ्यांचे शास्त्रज्ञांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गुप्ता तर आभार मनोज मयेकर यांनी मानले. या वेळी मुख्याध्यापिका श्रीजा नायर, मुख्याध्यापक जी.आर. कदम, समन्वयक पी. बी. मुळीक, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## क्लिक...क्लिक...!



अलिबाग : समुद्रकिनारी सुर्यास्तावेळी होणारे वातावरण पर्यटकांना आकर्षित करीत असते. वरसोली समुद्रकिनारी सूर्य अस्ताला जात असताना निसर्गातील रंगछटांचे स्नेहल मार्गे हिने काढलेले छायाचित्र.

# केबीपी कॉलेजच्या डॉ. प्रणिता भालेंना पुरस्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रकल्प अधिकारी डॉ. प्रणिता भाले यांना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत उत्कृष्ट संघनायक महिला पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्काराबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी त्यांचे व कौतुक केले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील १६ विद्यापीठांनी सहभाग घेतला, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे ३१६ स्वयंसेवक विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी झाले. मुंबई विद्यापीठाने सृजनशील लोककला, समूहगान, ललित कला, नाट्य, नृत्य आणि इतर स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. मुंबई विद्यापीठाने पथसंचलन स्पर्धेत 'द्वितीय क्रमांक, तसेच ललित कला गटातील 'गीतेचित्र' या स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

डॉ. प्रणिता भाले यांनी मुंबई विद्यापीठाच्या संघनायक म्हणून उत्कृष्ट जबाबदारी पार पाडल्याबद्दल पुणे विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या उपस्थितीत त्यांना 'उत्कृष्ट संघनायक महिला' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ज्येष्ठ दाम्पत्याचा लग्नाच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई स्टुडन्ट अँड युथ फाउंडेशनच्या वतीने वाशी येथील सिडको एक्सझीबिशन सेंटर येथे आयोजित नवी मुंबईतील सानपाडा गावचे ज्येष्ठ ग्रामस्थ पांडुरंग सिताराम पाटील व पार्वती पांडुरंग पाटील यांच्या विवाहपूर्तीच्या हिरक महोत्सवी दिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सहजीवनाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ दांम्पत्यांच्या माध्यमातून नवतरुणांना आदर्श संसाराचे हित कळावे, असे उद्दिष्ट्य लक्षात ठेवून या सोहळ्याचे आयोजन केले होते.

या प्रेरणादायी संदेश देणाऱ्या सोहळ्यात राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. मंत्री गणेश नाईक यांनी ज्येष्ठ उभयतांस त्यांच्या पुढील जीवनासाठी अभिष्टचिंतनपर सत्कार केला. या वेळी व्यासपीठावर माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदिप नाईक, न.मुं.म.पा चे माजी महापौर जयवंत सुतार, सभागृह नेते अनंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते प्रा. अविनाश कुलकर्णी सर, ह.भ.प गुरुवर्य निलेश महाराज कुलकर्णी, युवा नेते निशांत भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, सुनंदा पाटील, समाजसेवक विजय वाळुंज हे उपस्थित होते.

या सोहळ्यात आयोजकांच्या वतीने वैवाहिक जीवनाची हिरक महोत्सवी वर्षे पूर्ण केल्याबद्दल पांडुरंग पाटील व पार्वती पाटील यांची धान्याने व शालेय वह्यांनी तुळा करण्यात आली. तुळा केलेले धान्य वाशीतील आरोग्यदूत म्हणून कार्य करणाऱ्या कचरावेचक भगिनींना तर तुळेतील वह्या या त्रंबकेश्वर येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

## निवडक

### झाडावरून पडून मुलगा जखमी



**खालापूर :** खोपोलीतील पाताळगंगा नदी किनारी असणाऱ्या आंब्याच्या झाडावर विवेक शंकर साखरे (वय १२, रा. तांबडी वासरंग) हा मुलगा कैऱ्या काढण्यासाठी झाडावर चढला असता. अंदाज न आल्याने पाय घसरला व झाडावरून खाली पडून पाय मोडला. विवेक यास खोपोलीतील डॉ. सतीश जाखोटिया यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. पालकांनी उन्हाळा व आंब्याचा हंगाम सुरू होत असल्याने आपल्या मुलांवर लक्ष ठेवण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सुरेश दिघे, प्रवीण शिंदे यांनी केले आहे.

### मराठी भाषा गौरव दिन साजरा



**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्.मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने बदलापूर येथील 'ग्रंथसखा', 'शब्दसखा' या ग्रंथालयांचे निर्माते जवळपास चार लाख पुस्तकांचे संग्राहक श्याम जोशी यांच्या 'अभिजात मराठी' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्राचार्य डॉ. सदानंद धारप, ग्रंथपाल अर्चना कर्णिक, जी. जी जोशी, डॉ. हेमलता सावंत, डॉ. देवीदास बामणे, विनायक गोखले आदी उपस्थित होते.



**रोहा : वरसे ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच रामा म्हात्रे यांचे राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, पत्रकार महादेव सरसंबे, कोळी समाज नेते नवनीत डोलकर आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# शेकडो वन्यजीव, वृक्षांची होरपळ रोखली

## ११५ वणव्यांपैकी ८० वणवे विझवण्यात यश

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या अनेक तालुक्यातील डोंगर पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर वनवे लागत आहेत. सततच्या वनव्यांमुळे सजीव सृष्टीची होळपळ होत आहे. जिल्ह्यातील माणगाव व रोहा तालुक्यात मागील चार आठवड्यात ११५ ठिकाणी वनवे लागल्याची नोंद झाली. त्यापैकी तब्बल ८० वणवे यशस्वीरित्या विझवण्यामध्ये सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला यश आले. यामुळे शेकडो वन्यजीव व वृक्षांची होळपळ रोखली गेली आहे.

विशेष म्हणजे आधुनिक उपकरणांचा वापर करून जलद गतीने वणव्यांवर नियंत्रण मिळवण्यात आले. यासाठी वनविभागाचेदेखील मोलाचे सहकार्य लाभले. सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट पुणे, दीपक नाइट्रेट लिमिटेड रोहा तसेच सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान या टीम वनवे विझवण्यामध्ये सहभागी झाल्या होत्या. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.





हे वणवे रोखण्यासाठी प्रयाग बामुगडे, श्वेता विश्वकर्मा, सागर दहिंबेकर शुभम सणस, आदेश पाटेकर, अजय बोगटे, विशाल जाधव, निलेश लोखंडे अजय राजीवले, प्रणय सागवेकर, विनय ठाकूर, प्रवीण भगत, अनुप देशमुख, कृतिका वारंगे, विजया मगर, श्रावणी भोई, स्वयम् धनवडे, यश सानप, युतीश बारटक्के, सुजल पडवळ, ओंकार पडवळ आदींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोणताही शासकीय सहाय्यता नसूनसुद्धा ३५०० हून अधिक वनवे पाच वर्षांमध्ये विजवण्यामध्ये यश आले आहे. संस्थेला तातडीने एयर ब्लोर ची आवश्यकता होती. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांच्यामार्फत संस्थेला १,२५,००० रुपयांचे एअर ब्लोअर भेट स्वरूपात देण्यात आले आहेत.

तसेच नंदू चव्हाण यांनी एअर ब्लोअरसाठी तब्बल आठ हायड्रेशन बॅक तसेच आठ हेड टॉर्च भेट दिल्या. या उपक्रमामुळे वणव्यांवर नियंत्रण मिळवणे अधिक जलद व सोपे होत आहे.

**जंगलाला लागणाऱ्या वनव्यांसाठी आमची टीम अहोरात्र कष्ट करत आहोत. यासाठी आम्ही ऑपरेशन अरण्य आपदव ही मोहीम राबवित आहोत. आम्हाला ९९२२३३०२८६, ७३८५७४४२५०, ७४४७३५७२९९ या क्रमांकावर संपर्क करा.**

**–सागर दहिंबेकर, सदस्य, सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था**

### तत्पर कामगिरी

टीमपर्यंत ज्यावेळी वनवे लागण्याची खबर पोहचली त्यावेळी क्षणाचाही विलंब न करता ही टीम तत्परतेने वणवे विझवण्यासाठी पोहचली. उपलब्ध साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करून वणव्यांवर नियंत्रण मिळवता आले. दिवस असो की रात्र असो की रात्र टीम लागलीच वणवा लागला आहे, त्या ठिकाणी पोहचून आपली कामगिरी तत्परतेने करत होती. तीव्र डोंगर उतार, दरी अशा धोक्याच्या ठिकाणीदेखील जाऊन जीवाची बाजी लावून वणव्यांवर नियंत्रण मिळवण्यात आले.

### संकट टळले


या वणव्यांना भिजवण्यात यश आल्यामुळे येथील वन्यजीव, सूक्ष्मजीव आणि झाडे झुडपे व वनस्पती यांचा जीव वाचला परिणामी सजीव सृष्टीवरील संकट टळले. याशिवाय पर्यावरण प्रदूषित होण्यापासूनदेखील रोखता आले.

## कर्जतच्या श्री सदस्यांकडून रस्त्याची स्वच्छता

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वच्छता अभियान २०२५च्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील १८०२ श्रीसदस्यांनी तब्बल ४७.९ किलो मिटरचे रस्ते स्वच्छ केले असून कर्जत शहरातील २७ ठिकाणचा परिसरही स्वच्छ केला. एकूण एक लाख तेरा हजार ५२५ चौरस मिटरचा परिसर स्वच्छ केला. त्यांना कर्जत नगर परिषद स्वच्छता विभागाने सहकार्य केले.

श्रीसदस्यांनी सकाळ पासूनच स्वच्छता अभियानाला सुरुवात केली. सांगवी बैठकीतील श्रीसदस्यांनी जकात नाका ते



सुरभी ज्वेलर्स, बारणे व सावळे बैठकीतील श्रीसदस्यांनी उप जिल्हा रुग्णालया परिसर, नसरापूर बैठकीतील श्रीसदस्यांनी आणि पिंगळस बैठकीतील श्रीसदस्यांनी दहिवली विठ्ठल मंदिर परिसर, भिसेगाव व गौळवाडी बैठकीतील श्रीसदस्यांनी फातिमा नगर, वन विभागाचे कार्यालय परिसर, मुद्रे व भिवपुरी बैठकीतील श्रीसदस्यांनी चारफाटा ते श्रीराम पूल परिसर, पोसरी व कडाव बैठकीतील श्रीसदस्यांनी न्यायालय व अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचा परिसर, वावळोली व किरवली बैठकीतील श्रीसदस्यांनी पोलीस ठाणे, तहसील कार्यालय आणि नगर परिषद परिसरातील स्वच्छता केली.

एकूण ३४७७ किलो ओला कचरा तर सोळा हजार ८०९ किलो सुका कचरा गोळा केला.

## बौद्धिक स्पर्धेत आजिवली शाळेचे यश

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील गणित व इंग्रजी या विषयाच्या बौद्धिक स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत १४ केंद्रातील २५० विद्यार्थी सहभागी होते त्यात वावोशी केंद्रातील अजिवली वनवठे एक शिक्षकी शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्वाधिक स्पर्धेत यश प्राप्त केलेले आहे

गणितामध्ये शारदा पाटील प्रथम क्रमांक, अवनी भोईर तृतीय क्रमांक, हर्षदा पाटील तृतीय क्रमांक तर इंग्रजीमध्ये जिया कदम हिने तृतीय क्रमांक मिळविला आहे. कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण सोहळ्यास जिल्हा शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, तालुका गटशिक्षणाधिकारी कैलास चोरामले, विस्तार अधिकारी दास –पवार व केंद्रप्रमुख जयंत पाटील इनरव्हील क्लब पनवेल मेंबर यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह



देण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी खूप मेहनत व यश प्राप्त केले आहे तसेच वैशाली शशिकांत नाचण यांचे शाळेतील विविध उपक्रम व त्यांची मेहनत यामुळेच हे शक्य झाले आहे. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष छाया कदम, अनिता भोईर, मंजुळा पाटील व संदीप पाटील आदी उपस्थित होते.

## छत्रपतींची बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा; संभाजी ब्रिगेडची मागणी

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

छत्रपती शिवराय, राजमाता जिजाऊ आणि छत्रपती संभाजीराजे बदनामीमुळे महाराष्ट्रभर असंतोष वाढत असून शिवद्रोही प्रशांत कोरटकर नागपूर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी कर्जत पोलीस स्थानकात संभाजी ब्रिगेड संघटनेतर्फे आक्रमक पवित्रा घेत गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

कोरटकर वर एफ आय आर दाखल करण्यासाठी संदर्भ पुरावे



सांगण्यात आले व जोपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रकिया पूर्ण होत नाही तोपर्यंत कर्जत पोलीस स्टेशनमध्ये प्रकरणाचा नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे.

दहिवली परिसरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारका जवळ संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त करून कर्जत पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

या वेळी आकाश कांबळे, रोहिदास लोभी, विशाळ माळी, वसंत कोळंबे, अनिल भोसले, श्रीकांत आगिवले, दीपक भालेराव आदी उपस्थित होते.

## माथेरानमधील गव्हाणकर शाळेत मराठी काव्य जागर

**माथेरान : प्रतिनिधी**

अजेय संस्था ठाणे यांच्या वतीने दृकश्राव्य माध्यमातून मराठी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने माथेरानमधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर शाळेत विद्यार्थ्यांसाठी 'दशपदी' या खास काव्य जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अजेय संस्थेमार्फत लेखक, दिग्दर्शक तथा नाटककार डॉ. क्षितिज कुलकर्णी आणि प्रसन्न शांताराम माळी अभिनेता व काव्यवाचक यांच्या सादरीकरणातून विद्यार्थी आणि उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.

कवी कुसुमाग्रज यांच्या कणा या कवितेचे सुरुवातीला चित्ररूपात सादरीकरण



करण्यात आले. त्यानंतर काव्यभाष्य झाले. गणपत वाणी सांगाती यासारख्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना त्याचे अर्थ उलगडून सांगण्यात आले. या वेळी शाळेचे विद्यार्थिनी जारा नईम शेख, आणि शिक्षक कवी संघपाल वाठोरे यांच्या कवितांचे सादरीकरण झाले.

कार्यक्रमाचे आयोजन अजेय संस्थेच्या सदस्या आणि माथेरान नगर परिषदेच्या माजी नगरसेविका विदुला मनोज खेडकर यांच्या सहकार्यातून करण्यात आले होते. या वेळी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका विदुला गोसावी यांनी हा कार्यक्रम पुन्हा मोठ्या स्वरूपात शाळेत राबविण्यात यावा यासाठी विनंती केली. सूत्रसंचालन आणि आभार संघपाल वाठोरे यांनी केले.

दशपदी या सदराखाली अजेय संस्था यांनी सादर केलेला अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. कवितेचे दृकश्राव्य स्वरूपात अगदी सोप्या शब्दात सादरीकरण केल्याने कविता अगदी सहज समजतात. कवितेमागील इतिहास आणि माहीत नसलेल्या गोष्टीसुद्धा डॉ. क्षितिज कुलकर्णी आणि प्रसन्न माळी यांच्या संवादातून स्पष्ट होतात अतिशय छान कार्यक्रम आहे, असे विदुला खेडकर म्हणाल्या.

## जिते येथे निबंध स्पर्धा उत्साहात

**पेण :** महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे ह्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याच्या महिला बालकल्याणमंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शन खाली पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे जिते जिल्हा परिषद मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वराज सप्ताह कार्यक्रम निमित्त बाळगंगा विद्यामंदिर जिते हायस्कुल येथे निबंध स्पर्धा झाली.

या निबंध स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभास राष्ट्रवादी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पेण ता. अध्यक्ष दयानंद भगत, राष्ट्रवादी पेण विधानसभा सदस्य ललिता ठाकूर, शिक्षक सेल अध्यक्ष नथुराम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिते जि.प. मतदारसंघ अध्यक्ष सुदर्शन पाटील जिते पं. समिती अध्यक्ष धर्मेंद्र म्हात्रे, पेण ता. युवक उपाध्यक्ष कैलास रुठे, युवक उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शाळेच्या मुख्याध्यापक सौ वर्तक मॅडम व शिक्षक वर्ग ह्यांनी विशेष मेहनत घेतली.

## विद्यार्थ्यांकडून विज्ञान प्रयोग सादरीकरण



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव विविध उपक्रमात सातत्याने चर्चेत असल्यामुळे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने विज्ञान प्रयोगाचे आयोजन खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण, व निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, गटशिक्षणाधिकारी कैलास चोरामले यांच्या उपस्थित त्यांच्या दालनात विद्यार्थ्यांनी प्रयोग सादरीकरण केले.

त्यांच्यामध्ये असलेले कौशल्य आणी सहज आणी सोप्या भाषेमध्ये समजावून सांगत असल्यामुळे तहसीलदार यांनी विद्यार्थ्यांच्यावर कौतुकांची थाप टाकत मुलांचे कौतुक केल. या वेळी विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणात सहभाग घेऊन उत्तम असे प्रयोग सादर करण्यात आले. शाळेय शिक्षण घेत असतांना हे विज्ञान विषय हे अभ्यास क्रमात असल्यामुळे तसेच प्रयोगाच्या माध्यमातून आपण त्यांचा दैनंदिन जिवनात यांचा उपयोग करून आपला बहुमूल्य वेळ वाचावू शकतो. आपल्या घरामधून टाकावू अथवा बाजार पेठेत सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंपासून त्यांचे प्रयोग करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांमध्ये असलेली कला विकसित व्हावी शिवाय त्यांना विज्ञान विषयी जागृतता निर्माण झाल्यास या प्रयोगाच्या माध्यमातून भविष्यात मोठे वैद्यानिक होतील ह्या दृष्टीकोणातून विज्ञान प्रदर्शन आयोजन शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून करून घेतले जात असल्यांचे मुख्याध्यापक सुभाष राठोड, शिक्षका सरस्वती कवाद, उपशिक्षक स्वयंसेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर आदी उपस्थित होते.

## पालीत मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त स्वाक्षरी उपक्रम

**पाली : प्रतिनिधी**

मराठी राजभाषा गौरव दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. २७) पालीत मराठीत करूया स्वाक्षरी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन परिचय असणाऱ्या शंभर पुस्तकांचे वाटपदेखील करण्यात आले.

आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र पुणे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पाली शहर उपाध्यक्ष अंकुश आपटे यांच्या सौजन्याने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यकारणी पाली आणि महिला आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

श्री छत्रपती संभाजी महाराज चौक पालीमधली आळी येथे सकाळी १० वाजल्यापासून सनई चौघड्यांच्या सुरात कार्यक्रमाची सुरुवात झाली. आज मराठीत करूया स्वाक्षरी या उपक्रमाला शेकडो जणांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून पंचायत समिती पालीच्या माजी सभापती शुभांगी कारखानीस या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला अध्यक्ष रुपाली भणगे यांनी केले.

मनोगतातून शुभांगी कारखानीस, रूपाली भणगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील राऊत, अस्मिता घरत व उपनगराध्यक्ष आरिफ मनियार यांनी हा उपक्रम व अंकुश आपटे यांच्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

या कार्यक्रमास पाली नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा प्रणाली शेळके, उपनगराध्यक्ष आरिफ मनियार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक सुलतान बेनसेकर, सुधीर भालेराव, शिवसेनेच्या नगरसेविका कल्याणी दपके, जिगीषा खोडागळे, अपक्ष नगरसेवक पराग मेहता, भाजप नगरसेवक गणेश सावंत, जुईली ठोंबरे, शिवसेना जेष्ठ नेते शिवराम पवार, आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते महेश खंडागळे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अमित निंबाळकर, भाजप पाली उपाध्यक्ष प्रदीप गोळे, द्रविड सर, नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.



## खालापुरात स्वच्छता मोहीम



**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ. श्री नारायण विष्णू धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अंतर्गत रविवारी राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत खालापूर तालुक्यात शेकडो टन कचरा गोळा करण्यात आला. प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून स्वच्छता मोहीम व्यापक प्रमाणात राबविण्यात येते.

यावर्षीच्या सफाई मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छता मोहीम केवळ देश पातळीवर मर्यादित न राहता समर्थ बैठक असलेल्या विविध देशातदेखील राबविण्यात आली. रविवारी सकाळी आठ वाजल्यापासून हजारो श्री सदस्य हातात झाडू, घमेल, फावडा, कोयता, हातपंप अशा विविध साधनसामुग्रीसह सफाई मोहिमेत गुंतले होते. खालापुरातील तहसील कार्यालय, पोलीस ठाणे पंचायत समिती, प्राथमिक आरोग्य केंद्र, गाव पातळीवर शाळेचा परिसर तसेच खोपोली शहरात नगर परिषद कार्यालय, बस स्थानक, पोलीस ठाणे परिसर आणि भाजी मंडई परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत तालुक्यातील विविध समर्थ बैठकीतून सुमारे १२६८ सदस्य सहभागी झाले होते. खालापूर नगरपंचायत, खोपोली नगर परिषद यांनी कचरा संकलन करण्यासाठी घंटागाडीचे व्यवस्था केली होती. ओला व सुका कचरा जमा करण्यात आला. खालापूर येथील स्वच्छता मोहिमेत नगरपंचायत खालापूरच्या नगराध्यक्षा रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, नगरसेवक राजेश पार्क, खालापूर पोलीस ठाण्यातील कर्मचारी आशिष पाटील यानेदेखील सहभाग घेतला.

प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या श्री सदस्यांना मास्क आणि हॅन्ड ग्लोजची व्यवस्था करण्यात आली होती.

# ‘मिस्ट्री स्पिनर’ वरुण चक्रवर्तीचा पंच!

## चॅम्पियन्स ट्रॉफी खेळताना पहिल्याच सामन्यात खास कामगिरी

**दुबई : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील साखळी फेरीतील अखेरचा सामना फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीने गाजवला. २५० धावांचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडचा अर्धा संघ तंबूत धाडत त्याने भारताच्या विजयात मोलाचा हातभार लावला. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आतापर्यंतच्या इतिहासात एका सामन्यात पाच विकेट्स घेणारा भारताचा तो तिसरा गोलंदाज ठरला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात वरुण चक्रवर्तीने पाच विकेट्स घेत खास पराक्रमाला गवसणी घातली. दुबईच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात वरुणने १० षटकांत ४२ धावा खर्च करताना पाच फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवले. यात सलमावीर विल यंग त्याची पहिली शिकार ठरला.



त्याच्याशिवाय ग्लेन फिलिप्स, मायकेल ब्रेसवेल, मिचेल सँटनर आणि मॅट हेन्री यांची त्याने विकेट घेतली.

मोहम्मद शमीनेही आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील पदार्पणाच्या सामन्यातच पाच गडी बाद करण्याची किमया साधली होती. यंदाच्या हंगामात शमी पहिल्यांदाच चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात शमीने १० षटकांच्या कोट्यात ५३ धावा खर्च करत पाच विकेट्स घेतल्या.

रवींद्र जडेजा हा भारताकडून चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत पाच विकेट्स घेणारा पहिला गोलंदाज आहे. त्याने २०१३च्या हंगामात वेस्ट इंडिज विरुद्धच्या सामन्यात ‘पंजा’ मारला होता. या सामन्यात जड्डूने १० षटकांच्या कोट्यात फक्त ३६ धावा खर्च करताना अर्धा कॅरेबियन संघ तंबूत धाडला होता.

### दोन अनोखे विक्रम

स्पर्धेच्या आतापर्यंतच्या इतिहासात याआधी कोणत्याही संघातील गोलंदाजांनी एका हंगामात दोन वेळा पाच विकेट्स हॉलचा डाव साधलेला नाही. भारतीय संघाने यंदाच्या हंगामात ही खास कामगिरी करीत नवा रेकॉर्ड सेट केला आहे. विशेष म्हणजे पहिल्यांदा गोलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडच्या संघाकडून मॅट हेन्रीने पाच विकेट्स घेतल्याचे पहायला मिळाले. धावांचा बचाव करताना वरुण चक्रवर्तीने भारताकडून पाच विकेट्स घेत ‘किवीं’च्या फलंदाजीतील जीव काढला. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात एका मॅचमध्ये दोन्ही संघातील गोलंदाजांनी पाच विकेट्स घेण्याची ही पहिलीच वेळ ठरली. त्यामुळे ही मॅच खास आणि एक नवा विक्रम नोंदवणारी ठरली.

# मॅथ्यू शॉर्टच्या जागी अष्टपैलू कूपर कॉनोली ऑस्ट्रेलिया संघात

**दुबई : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या ताफ्यातील स्फोटक सलामावीर मॅथ्यू शॉर्ट अफगाणिस्तानविरुद्धच्या लढतीत दुखापतग्रस्त झाला होता. दुखापतीमुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी ऑस्ट्रेलियन संघाने भारतीय संघाविरुद्धच्या सेमी फायनलआधी कूपर कॉनोली या अष्टपैलू खेळाडूला संघात स्थान दिले आहे.

कूपर कॉनोली या २४ वर्षी खेळाडूने आतापर्यंत ऑस्ट्रेलियाकडून सहा आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. यात तीन वनडेचा समावेश आहे. तो मध्यफळीतील फलंदाज असून ऑफ स्पिन गोलंदाजीही



करतो. भारतीय संघाविरुद्ध अतिरिक्त फिरकीपटूचा वापर करता येईल, याच हेतून ऑस्ट्रेलियाने त्याच्यावर डाव खेळल्याचे दिसते.

ऑस्ट्रेलियन संघ १६ वर्षांनी पहिल्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या नॉकआउट फेरीत पोहचला आहे. ‘कांगारू’च्या संघाने २००९मध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकली होती. यंदाच्या हंगामात फायनल गाठण्यासाठी त्यांच्यासमोर टीम इंडियाचे कडवे आव्हान आहे. भारतीय संघ वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील पराभवाची परतफेड करून मिनी वर्ल्डकपमधून ऑस्ट्रेलियाचा खेळ खल्लास करण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

ऑस्ट्रेलियन संघ : स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), सीन एबॉट, लेक्स कॅरी, बेन ड्वार्शुइस, नॅथन एलिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, रन हार्डी, ट्रॅविस हेड, जोस इंग्लिस, स्पेंसर जॉनसन, मार्नस लाबुशेन, ग्लेन मॅक्सवेल, तन्वीर सांघा, कूपर कॉनोली, ॲडम झम्पा.

# ...अन् विराट अक्षर पटेलच्या पाया पडला!




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने चॅम्पियन्स करंडक स्पर्धेच्या साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. या सामन्यात भारतीय खेळाडूंची मजामस्तीदेखील पहायला मिळाली. सामन्यादरम्यान भारताचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहली फिरकीपटू अक्षर पटेलच्या पाया पडताना दिसला.

सामन्यात नाणेफेक गमावणाऱ्या भारतीय संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. भारताची सुरुवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये तीन फलंदाज गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करीत संघाचा डाव सावरला. श्रेयसने ७९ धावांची, तर अक्षरने ४२ धावांची खेळी केली.

यानंतर भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य घेऊन न्यूझीलंडचा संघ मैदानात उतरला, मात्र किवी संघ भारताच्या फिरकीसमोर फेल ठरला. न्यूझीलंडच्या केन विल्यमसनने १२० चेंडूत सात चौकारांसह ८१ धावा करीत एकाकी झुंज दिली. त्याच्याशिवाय कोणताही किवी फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी संघर्ष करायला लावला. अखेरीस भारताने न्यूझीलंडचा संघ २०५ धावांवर सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.

सामन्यादरम्यान विराट कोहलीने अक्षर पटेलच्या पाया पडताना पहावयास मिळाला. त्याची अशी कृती करण्यामागे खास कारणही आहे. २५० धावांचे माफक लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेला न्यूझीलंडचा संघ सुरुवातीला सुस्थितीत होता न्यूझीलंडचा दिग्गज खेळाडू केन विलियम्सन ८१ धावांवर नाबाद होता. अक्षर पटेलने त्याच्या कोट्यातील शेवटच्या चेंडूवर विलियम्सनला बाद केले. विलियम्सन बाद होताच भारताने अर्धा सामना खिशात घातला. या विकेटच्या आनंदात विराट थेट अक्षरसमोर नतमस्तक झाला. याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे.

# अजिंक्य रहाणे केकेआरचा कर्णधार

**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्स संघाने नव्या हंगामासाठी अनुभवी क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याची नियुक्ती केली आहे. वेंकटेश अय्यर उप-कर्णधार म्हणून काम पाहील.

केकेआर संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेंकी म्हैसूर यांनी सांगितले की, अजिंक्यचा अनुभव संघासाठी अत्यंत मोलाचा असेल. त्याचे नेतृत्व कौशल्य सगळ्यांनाच ठाऊक आहे. अजिंक्यच्या नेतृत्वात आम्ही जेतेपद कायम राखू, तर नव्या जबाबदारीसंदर्भात बोलताना अजिंक्य म्हणाला, कोलकाता नाईट रायडर्स संघाचे नेतृत्व करणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. आमच्याकडे अतिशय संतुलित असा संघ आहे. जेतेपद राखण्यासाठी आम्ही तयारी सुरू केली आहे.

# कर्जतमध्ये कन्याथॉनला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

महिलांच्या शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी कन्याथॉन २०२५ या विशेष मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि विजयभूमी युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या स्पर्धेस प्रतिसाद लाभला.

पोसरी येथे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात झाली. या वेळी माजी नगरसेवक संकेत भासे, रोटरी कलबचे अध्यक्ष दिपचंद ओसवाल, जितेंद्र ओसवाल, अरविंद जैन, सचिन ओसवाल, महेंद्र निगुडकर, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, विकास चित्ते, थलेनलच्या संस्थापक ॲड. प्रियांका ओझा आदी उपस्थित होते.

या स्पर्धेचे हे चौथे वर्ष होते. रन फॉर हर या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी राबविण्यात येत असतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि



त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी ही स्पर्धा अतिशय उपयुक्त ठरली आहे.

यंदा या स्पर्धेत तब्बल तीन हजार विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग नोंदवला. १०, ५ आणि ३ किमी मॅरेथॉन शर्यतींसह ३ किमी फन वॉक घेण्यात आली. १० किमी गटात प्रवीण कांबळे आणि दामिनी पेडणेकर, ५ किमी गटात स्वराज पाटील आणि प्रणाली सावंत, तर ३ किमी गटात मंगेश पार्डी आणि धनश्री कराळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ‘कन्याथॉन स्कॉलरशिप’ पारितोषिकाने सायली भोसले आणि बेबी खातून यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी माजी उपसभापती मनोहर थोरवे, जनार्दन भासे, रविकेश श्रीवास्तव, राजू पुजारी, सुरेश राव, नितिन श्रीवास्तव, प्रसाद थोरवे, ज्ञानेश्वर करणूक, शिरीष दिघे, मीना थोरवे, मनीषा भासे आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# काँग्रेस प्रवक्त्या शमा मोहम्मद यांची रोहित शर्मावर टीका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताने रविवारी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक दिली. आता उपांत्य फेरीत भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना पहायला मिळणार आहे. भारताच्या या विजयानंतर क्रिकेट चाहत्यांकडून भारतीय संघाचे कौतुक होत आहे. यातच आता काँग्रेसच्या प्रवक्त्या शमा मोहम्मद यांनी क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या शरीरावर केलेली एक टिप्पणी वादाच्या केंद्रस्थानी आहे.

रोहित शर्माच्या फिटनेसवरून आजवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते, मात्र त्याचा त्याच्या खेळावर कधीही दुष्परिणाम





दिसला नाही, पण काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी त्याला थेट ‘लठ्ठ’ खेळाडू म्हटले तसेच कर्णधार म्हणूनही तो वाईट असल्याचे शमा मोहम्मद म्हणाल्या.

रोहित शर्मा हा जागतिक दर्जाचा क्रिकेटपटू आहे, अशी एक्स पोस्ट अब्दुल गफार नामक युजरने केली होती. या पोस्टवर टिप्पणी करताना काँग्रेस प्रवक्त्या शमा मोहम्मद यांनी रोहित शर्मावर टीका केली. तो एक साधारण कर्णधार आणि तितकाच सामान्य क्रिकेटपटू आहे. त्याला नशीबाने कर्णधारपदाची संधी मिळाली, अशीही मुक्ताफळे त्यांनी उधळली.

### वादानंतर पोस्ट केली डिलीट

रोहित शर्मावरील पोस्टनंतर क्रिकेट चाहत्यांनी फैलावर घेतल्याने काँग्रेस प्रवक्त्या शमा मोहम्मद यांनी आपली पोस्ट डिलीट केली, मात्र त्यानंतर आपली भूमिका मांडताना पुन्हा सारवासारव केली. दरम्यान, शमा मोहम्मद यांच्या विधानाचा क्रिकेट चाहत्यांसह भाजपने निषेध केला आहे. त्यांनी क्रिकेटपटूच्या शारीरिक व्यंगावर भाष्य केले असून टी-२० विश्वचषक जिंकून देणाऱ्या कर्णधाराचा अवमान केला आहे, असे भाजप नेत्या राधिका खेरा यांनी म्हटले आहे. भारताची मान उंचावणाऱ्या क्रिकेटपटूंना लक्ष्य करण्याऐवजी त्यांनी काँग्रेस पक्षाची कमी होत चाललेली विश्वासार्हता जपण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा सल्लाही खेरा यांनी शमा यांना दिला आहे.



**पनवेल : चिपळाई क्रिकेट क्लब चिपळे व ग्रामस्थ मंडळ आयोजित आमदार चषक २०२५ स्पर्धेत संग्राम इलेव्हन नितळस संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक जय भावदेवी कुडावे, तृतीय सतरंगी स्पोर्ट्स हेदुटने (ब), चतुर्थ अमन ब्रिगेड वलप, पाचवा यंगस्टर उसर्ली आणि सहावा क्रमांक टायगर इलेव्हन देवद या संघाने मिळवला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**

# ऋषभ पंतला प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी नामांकन

**दुबई** : भारतीय संघातील स्टार विकेटकिपर बॅटर ऋषभ पंत सध्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी दुबईत असलेल्या भारतीय संघाच्या ताफ्यासोबत आहे, पण पहिल्या तीन सामन्यांत तो बाकावरच बसल्याचे पहायला मिळाले. त्याच्याऐवजी टीम मॅनेजमेंट लोकेश राहुलला पहिली पसंती देताना दिसून येत आहे. अपघातानंतर आश्चर्यकारक पदार्पणासाठी पंतला प्रतिष्ठित लॉरियस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्ससाठी नामांकित करण्यात आले आहे. वर्ल्ड कमबॅक ऑफ द इयर या गटातून त्याला नामांकन मिळाले आहे.

# रोहित शर्माच्या मुलाची पहिली झलक

### अहानसह खेळताना दिसली अनुष्का शर्मा



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत वि. न्यूझीलंड यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफीचा गट टप्प्यातील अखेरचा सामना पाहण्यासाठी क्रिकेटपटूंच्या पत्नी आणि कुटुंबीयांनी हजेरी लावली होती. याशिवाय हा विराट कोहलीचा ३००वा वनडे सामना होता, तो पहायला त्याची पत्नी अनुष्का शर्मादेखील दुबईत उपस्थित होती. विराट या सामन्यात काही विशेष करू शकला नाही आणि ११ धावा करून बाद झाला. दरम्यान, अनुष्काचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ती रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेह आणि मुलगा अहानसोबत दिसत आहे.

टीम इंडियाला पाठिंबा देण्यासाठी अनुष्का शर्मा आणि रितिका सजदेह दुबईच्या मैदानात पोहचल्या होत्या. या वेळी दोघीही एकत्र दिसल्या. दरम्यान, विराटचा भाऊ विकास कोहलीदेखील तिथे उपस्थित होत्या. अनुष्का शर्मा आणि रितिका सजदेहही बराच वेळ एकमेकांशी बोलत होत्या. तर या व्हायरल व्हिडिओमध्ये अनुष्का ही रोहित शर्मा आणि रितिका सजदेहचा मुलगा अहान यांच्याबरोबर खेळताना दिसत आहे. या वेळी ती अहानसह मस्ती करताना दिसली. अनुष्का शर्माचा हा व्हिडीओ व्हायरल होत असून चाहत्यांनी यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे.

याचबरोबर रोहित शर्माचा लेक अहान शर्माचा पहिला फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे, अनेकांनी हा फोटो शेअर केला आहे. रोहित शर्माचा लेक अगदी लहान असताना त्याची लेक समायरा जशी दिसायचा तसा दिसत आहे. त्यामुळे हा फोटो नक्कीच भारत-न्यूझीलंड सामन्यातीलच आहे याबद्दल निश्चितता नाही.

कर्णधार रोहित शर्मा गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये दुसऱ्यांदा बाबा झाला होता. त्याची पत्नी रितिका सजदेह हिने एका मुलाला जन्म दिला, तर विराट आणि अनुष्काही गेल्या वर्षी दुसऱ्यांदा आई-वडील झाले होते. त्यांनादेखील वामिका नावाची एक मुलगी असून अकाय नावाचा दुसरा मुलगा आहे.

# विराट मला स्वत:ची आठवण करून देतो!

### विवियन रिचर्ड्स यांच्याकडून किंग कोहलीचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजचे दिग्गज क्रिकेटपटू सर विवियन रिचर्ड्स यांनी विराट कोहलीच्या दृढनिश्चय, उत्साह, ज्वलंत दृष्टिकोन आणि उत्कटतेचं कौतुक केले आहे. विराट यामुळे क्रिकेटमधील प्रसिद्ध आणि महान खेळाडूंमध्ये दाखल झाला असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

विराटची आक्रमकता आणि धाडसाचे दीर्घकाळ चाहते असलेले रिचर्ड्स म्हणाले की, प्रत्येक खेळाडू कामगिरी खालावलेली असताना पुन्हा उभारी घेऊ शकत नाही, परंतु विराटची लढण्याची वृत्ती, ऊर्जा आणि विजयासाठी असलेली भूक त्याला इतरांपासून वेगळे करते.

आपल्या आक्रमक खेळीसाठी ओळखल्या जाणाऱ्या रिचर्ड्स यांनी विराट कोहली मला स्वत:ची आठवण करून देतो असे सांगितले. अनेक महान फलंदाज आहेत. याआधी सचिन तेंडुलकर होता, पण आता मॉडर्न जमान्यात विराट कोहली आहे. तो मला माझी आठवण करून देतो. तो हिंमत करतो, जिंकतो. त्याचा स्वत:वर विश्वास आहे. त्याच्यात १२० टक्के आत्मविश्वास आहे. जेव्हा आक्रमकतेची गरज असते तेव्हा तो पुढाकार घेतो. मला



ते फार आवडते, असेही ते म्हणाले.

रिचर्ड्स यांनी कोहलीच्या उग्र ऊर्जेचेही कौतुक केले. त्याची ऊर्जा त्याच्या आवडीचे प्रतिबिंब आहे. मैदानावरील प्रत्येक क्षणात तो गुंतलेला असतो. तो एक क्षणही खेळ थांबवत नाही. यामुळेच तो एक मोठा खेळाडू आहे, असे सांगून त्याची फिटनेस आणि खेळाची भूक पाहता तो वयाच्या पन्नाशीतही खेळताना दिसू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

रिचर्डस यांनी पुढे म्हटले की, विराटने दुबईत पाकिस्तानविरोधात शतक ठोकले. यावरून त्याने आपण अद्याप सर्वोत्तम असल्याचे सिद्ध केले आहे.

रिचर्ड्स यांनी या वेळी विराट कोहली आणि सचिन तेंडुलकर यांची तुलना करण्यास नकार दिला. मी तुलना करण्यावर विश्वास ठेवत नाही. प्रत्येक खेळाडूची वेळ असते. त्या प्रत्येक खेळाडूने जे योगदान दिले आहे त्यासाठी त्यांचे कौतुक व्हायला हवे, असे मत त्यांनी मांडले.

रोहित शर्माच्या विसंगत फॉर्मबद्दल बोलताना रिचर्ड्स यांनी त्याला पाठिंबा दिला. तो एक उत्कृष्ट खेळाडू आहे. खेळाडू कठीण काळातून जातात, पण तो उपांत्य फेरीत आणि अंतिम फेरीत कसा कामगिरी करतो ते पाहूया, असे ते म्हणाले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com